नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७१ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. २७ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करणार

## फेसबुक प्रोफाईलला मामा जयंत पाटलांचा फोटो लावत भावनिक संदेश

मुंबई : (स. गांवकरी)



शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते प्राजक्त तनपुरे याचं ठरलं असून ते भाजपच्या वाटेवर असल्याचं निश्चित झालं आहे. मंगळवारी रात्री त्यांच्या भाजप प्रवेशाची तारीख निश्चित होणार असल्याची माहिती आहे. नुकत्याच झालेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीवेळी त्यांनी माघार घेतली होती. तेव्हापासून ते भाजपच्या वाट्यावर असल्याची चर्चा सुरू होती. त्यावर आता शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

प्राजक्त तनपुरे हे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचे भाचे आहेत. तसेच नगरमधील ते मोठे नेते आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या संपर्कात होते. आता ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे.

प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश जवळपास निश्चित झाल्यानंतर त्यांनी स्वतःचे फेसबुक प्रोफाईल बदलले असून डीपीमध्ये जयंत पाटलांचा फोटो लावला आहे. त्यामुळे एक प्रकारचा हा भावनिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे. प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाची तारीख निश्चित होणार असून बुधवारी किंवा गुरूवारी ते भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेशामुळे नगरमध्ये भाजपची ताकद वाढणार असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीला मात्र तो मोठा धक्का असेल अशी चर्चा आहे. राहुरी पोटनिवडणुकीतून माघार घेतल्यानंतर प्राजक्त तनपुरेंनी केलेल्या वक्तव्याची चांगलीच चर्चा सुरू झाली होती. माझ्यासोबत पक्षात असणारे तिघेजण राष्ट्रवादी अजित पवार पक्षात गेले, तिकडे त्यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. मात्र, दुसरीकडे आमच्यासारखे निष्ठा ठेवणाऱ्या राजकारण्यांचे राजकारण संपत चालले आहे याचे दुःख होते, अशी भावना प्राजक्त तनपुरे यांनी बोलून दाखवली होती.

2024 च्या विधानसभा निवडणुकीत घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवावी असा प्रस्ताव आला होता. पण मला निष्ठा, तत्व याच्याशी प्रामाणिक राहावं असे वाटले. पण सध्याचे राजकारण म्हणजे जो तत्वाशी जोडला राहील त्याचे राजकारण संपत आहे. याउलट जे तत्त्वांशी तडजोड करतात ते सत्तेत मोठ्या पदावरती जातात अशी स्थिती आहे, अशी खंत प्राजक्त तनपुरे यांनी अलीकडेच बोलून दाखवली होती. त्यांच्या 'या' वक्तव्यानंतर प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये जाण्याच्या पर्यायाचा गांभीर्याने विचार करत आहेत अथवा त्यांनी त्यांचा निर्णय घेतला आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती.

# ‘पक्षाची बदनामी थांबवा, ठामपणे भूमिका मांडा!’ : सुनेत्रा पवार

मुंबई : (स. गांवकरी)



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची मंगळवारी सायंकाळी उशिरा बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाची बदनामी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षाची बदनामी थांबवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी ठामपणे आपली भूमिका मांडावी. पक्षात कोणतीही फूट पडणार नाही, पक्ष एकसंध आहे, असा संदेश लोकांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी वरिष्ठ नेत्यांना दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांची बैठक मंगळवारी सायंकाळी उशिरा पार पडली. पक्षात फूट पडणार असल्याचा रोहित पवार यांचा आरोप आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदावरून निर्माण झालेल्या संभ्रमानंतर झालेली ही पक्षाची पहिलीच बैठक होती. बैठकीच्या सुरुवातीलाच सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदाविषयी निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत सुनेत्रा पवार यांनी सारवासारव केली. पक्षात ज्येष्ठ नेत्यांचा योग्य सन्मान केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. पक्षात फूट पडणार आहे, २२ आमदार शरद पवार गटात सहभागी होणार आहेत, असे सांगून पक्षाची बदनामी केली जात आहे, त्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षात कुठली फूट पडणार नाही. पक्ष एकसंध आहे, असा संदेश समाजात गेला पाहिजे. त्या विषयी वरिष्ठ नेत्यांनी माध्यमांमध्ये बोलले पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. माध्यमांमध्ये पक्षाची भूमिका मांडण्याची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके, छगन भुजबळ, अनिल पाटील यांच्यावर सोपविण्यात आली.

## थोडक्यात...



### अकोल्यात इंधन विक्रीचा उच्चांक

मुंबई (स. गांवकरी) : राज्याच्या ग्रामीण भागांत पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांना डिझेल मिळत नाही. शेतकऱ्यांच्या नावाखाली साठेबाजी केली जात आहे, त्यामुळे अन्न नागरी पुरवठा विभाग आणि गृह विभागाचे संयुक्त पथक राज्यभर निरीक्षण, देखरेख करणार आहे. साठेबाजांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत. शेतकऱ्यांना इंधन मिळत नसल्याचा मुद्दा मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित करण्यात आला. या वेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी जिल्हानिहाय पेट्रोल, डिझेल, सीएनजी पुरवठ्याचे आकडे सादर केले. अकोला, अमरावती, बीड, भंडारा, बुलढाणा, धुळे, जळगाव, नांदेड, धाराशिव, नाशिक, परभणी, सोलापूर जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत ५० ते १५४ टक्क्यांपर्यंत डिझेल विक्रीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे डिझेल पुरवठा सुरळीत असतानाही तुटवडा जाणवत आहे. साठा करणाऱ्यांमुळे शेतकऱ्यांना डिझेल मिळत नाही. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी, साठेबाजांना आळा घालण्यासाठी अन्न नागरी पुरवठा आणि गृह विभागाचे संयुक्त पथक सर्वसाधारण तपासणी मोहीम राबविणार आहे. यामध्ये सापडणाऱ्या साठेबाजांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात येणार आहे.

### कडूंचा सरकारमधील मंत्र्याला घरचा अहेर

अमरावती (स. गांवकरी) : शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आंदोलनाचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे त्यांचे म्हणणे आहे. बच्चू कडू यांनी सोबतच भाजपचे नेते आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यावरही टीका केली आहे. गिरीश महाजन यांनी विरोधी पक्षात असताना कापसाला ८ हजार रुपये भाव मागितला होता, पण सत्ता आल्यानंतर ते शांत बसले, असे बच्चू कडू म्हणाले. पत्रकारांशी बोलताना बच्चू कडू यांनी काँग्रेसवरही टीका केली. बच्चू कडू म्हणाले, काँग्रेसच्या सरकारमध्येही शेतकऱ्यांचे हालच झाले. सत्तेच्या बाहेर आहेत, म्हणून शेतकऱ्यांची आठवण काढायची आणि सत्ता येताच शेतकऱ्यांना दूर सारायचे, असे होता कामा नये. काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन केले, त्याचे आम्ही स्वागतच करतो. पण, तुम्ही तुमच्या शब्दावर कायम राहिले पाहिजे. भाजपचे मंत्री गिरीश महाजन जेव्हा सत्तेत नव्हते, तेव्हा त्यांनी कापसाला ७ ते ८ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मागितला होता. त्याला दहा वर्षे उलटून गेली आहेत.

### अहिल्यानगरची जागा भाजपला मिळावी

अहिल्यानगर (स. गांवकरी) :संख्याबळ जास्त असल्याने विधान परिषदेच्या निवडणुकीची अहिल्यानगरची जागा भाजपकडेच राहील पक्षाची उमेदवारी भाजप पमधील निष्ठावंतांनाच मिळावी अशी माझी ही अपेक्षा आहे मात्र वेगळा निर्णय होऊ शकतो असे मत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज, मंगळवारी नगरमध्ये बोलताना व्यक्त केले. माजी खासदार सुजय विखे हेही इच्छुक असावेत असा दावाही त्यांनी केला. चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोहोत्सवाचे आयोजन ३१ मे रोजी करण्यात आली आहे. या महोत्सवाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत सभापती शिंदे यांनी वरील मत व्यक्त केले.

# मिरारोडमध्ये गृहसंकुलात बकरे आणण्यावरून तणाव

वसई : (स. गांवकरी)




मिरा रोड येथील एका उच्चभ्रू गृहसंकुलात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर बकऱ्या आणण्यावरून सुरू झालेल्या वादाला आता हिंसक आणि राजकीय वळण लागले आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी या घटनेविरोधात आक्रमक पवित्रा घेत सोसायटी परिसरात आंदोलन केले. यादरम्यान हनुमान चालीसा पठण, घोषणाबाजी आणि चक्क डुकरांना सोसायटीत नेण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले. या संपूर्ण वादात आता भाजप नेते किरीट सोमय्या यांनी उडी घेतली असून, त्यांनी सोसायटीत भेट देत स्थानिक मुस्लिम नेत्यांवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. मिरा रोड येथील ‘पुनम क्लस्टर’ या विविध धर्मीय नागरिक वास्तव्यास असलेल्या गृहसंकुलात काही मुस्लिम रहिवाशांनी दोन दिवसांपूर्वी बकरी ईदच्या कुर्बानीसाठी बकऱ्या आणून ठेवल्या होत्या. गृहसंकुलात आणि उघड्यावर अशा प्रकारे प्राणी आणण्याला इतर शाकाहारी, जैन आणि हिंदू रहिवाशांनी तीव्र आक्षेप घेतला. यावरून सोसायटीमध्ये वादाची ठिणगी पडली. सोमवारी रात्री या वादाचे रूपांतर थेट बाचाबाची आणि हाणामारीत झाले. आंदोलनकर्त्यांचा एका मुस्लिम व्यक्तीसोबत वाद झाला, ज्यामध्ये त्या व्यक्तीने ब्लेडने हल्ला केल्याचा आरोप बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

# केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा शेतकऱ्यांना दिलासा देणार

## दिल्लीतील कांदा, साखर उद्योगाबाबतच्या उद्याच्या बैठकीकडे लक्ष

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटीराज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. ल यांच्यासह अन्य मंत्री दिल्लीला जाणार आहेत. केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. २०१९ मध्ये साखरेचे किमान विक्री मूल्य (एमएसपी) ३१ रुपये प्रति किलो निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर २०२६ पर्यंत एमएसपीमध्ये कोणतीही वाढ झाली नाही. पण, २०१९ मधील २,७५० रुपये प्रति टन असलेली एफआरपी वाढून २०२६ मध्ये २९.१० टक्क्यांनी वाढून ३५५० रुपयांवर गेली आहे. साखरेचा दर २०१९ पासून स्थिर आणि एफआरपीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने उद्योगाला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यासह इथेनॉलच्या खरेदी दरातही अपेक्षित वाढ झाली नाही. इथेनॉल प्रकल्प आणि प्रकल्पाच्या विस्तारीकरणाला देण्यात येणाऱ्या व्याज सवलत, अनुदानेही १७. ११ कोटी रखडले आहेत. या सर्व विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. राज्यात कांदा दराचा प्रश्न चिघळला आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला एक रुपये, सव्वा रुपये प्रति किलो दर मिळत आहे.

संपूर्ण देशाच्या खरीप हंगामाची आढावा बैठक केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत होणार आहे. ही बैठक दोन दिवस चालणार असून, बैठकीला विविध राज्यांचे कृषिमंत्री आणि संबंधित वरीष्ठ अधिकारी उपस्थितीत राहणार आहेत.

कांदा दराच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने या प्रश्नी मंगळवारी चांदवड येथे मोर्चा काढल्यामुळे कांद्याच्या दराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नाफेड, एनसीसीएफकडून फक्त दोन लाख टन खरेदी होणार आहे. खरेदी गतवर्षीच्या तुलनेत कमी आणि कमी दराने होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावरही शहा यांच्या उपस्थितीत चर्चा होणार आहे.






# नामदार गडकरी यांच्यामार्फत मिळालेली रुग्णवाहिका ठरत आहे वरदान





# निलेश सोमाणी ठरत आहे सामाजिक उपक्रमाचे जनक : गणेश देगावकर

**रिसोड : (स. गांवकरी)**

रुग्णसेवा ही ईश्वर सेवा आहे. सर्व ठिकाणी अपघाताचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढत असून त्यावेळी जर अपघातग्रस्तांना वेळेवर उपचाराकरिता साधन उपलब्ध झाल्यास त्याचे आयुष्य वाचू शकतो,जीवनदान मिळू शकते. सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांनी लोकनेते केंद्रीय मंत्री नामदार नितीनजी गडकरी यांच्याकडे आईच्या स्मृती प्रित्यर्थ रुग्णवाहिका चालवण्याची इच्छा व्यक्त केली होती .नामदार गडकरी यांनी तत्काळ अत्याधुनिक ए.सी रुग्णवाहिका स्वामी विवेकानंद शिक्षण व्यायाम प्रसारक मंडळ धनज बू या संस्थेला उपलब्ध करून दिली सदर रुग्णवाहिका वाशिम जिल्ह्यामध्ये रुग्णांकरिता जीवनदान ठरत आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी अपघातग्रस्त बांधव किंवा अन्यकारणाने रुग्णालयात उपचार घेतलेल्या रुग्णांना या रुग्णवाहीकेने सेवा उपलब्ध करून दिली आहे, शेलु बाजार परिसरात सामाजिक कार्यकर्ते मोहित कर्नावट यांच्या माध्यमातूनही परिसरात दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर कोठेही अपघात झाला ही रुग्णवाहिका मोफत सेवा प्रदान करीत आहे इतकेच नव्हे तर रुग्णांना वेळेवर उपचाराकरिता दवाखान्यात पोहोचवल्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळालेली आहे .केवळ सामाजिक दायित्व मानून सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी ही सेवा रुग्णांना उपलब्ध करून देत आहे. अनेक रुग्णांना परिस्थिती नसल्यामुळे मोफत सेवा ही प्रदान करण्यात आली आहे. स्वतःच्या खिशाला झळ लावून ही सेवा त्यांनी आईच्या स्मृती पित्यर्थ दिली आहे. रुग्णवाहिका जेव्हापासून जिल्ह्यामध्ये आलेली आहे तेव्हापासून अविरत पने ही कार्यरत आहे. वाशिम शहरामध्येही अनेक रुग्णांना या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून सेवा मिळालेली आहे .नामदार गडकरी साहेब यांनी जो विश्वास दर्शविला त्या विश्वासाला पूर्णपणे सार्थ ठरवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. कोरोना काळातही नामदार गडकरी यांच्या माध्यमातून निलेश सोमानी यांनी अनेक शासकीय, खाजगी रुग्णालयाला ऑक्सिजन



कॉन्सन्ट्रेटर उपलब्ध करून दिले . सोबतच दोन कॉन्सन्ट्रेटरच्या माध्यमातून मोफत घरपोच सेवा रुग्णांना दिली. आजही अनेक रुग्णांना हे कॉन्सन्ट्रेटर अविरतपणे सेवा देत आहे .कोरोना काळामध्ये सुद्धा या सेवेमुळे अनेकांना मोठा आधार मिळालेला आहे. तीस वर्षाची अखंड सेवा.. गत तीस वर्षापासून सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी हे अविरतपणे दीनदलित आदिवासी दिव्यांग बांधव,गरजवंत यांना सेवा देत आहे कोणताही शासकीय निधी किंवा कोणत्याही नेत्यांकडून निधी न आणता सामाजिक दायित्वातून स्वतः व सामाजिक दानशूर कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ही सेवा त्यांनी दिलेली आहे. इतकेच नव्हे तर आपल्या मिळकतीतून 30% दान हे वेगवेगळ्या सेवेच्या माध्यमातून खर्ची करत आहे. देशातील अनेक नामवंत संस्था ज्यामध्ये उदयपूर राजस्थान येथील नारायण सेवा संस्था, वृंदावन येथील गो गोपाल संस्था, परम पूज्य साध्वी ऋतंबरा देवी यांची संस्था व वेगवेगळ्या दिव्यांग विधवा महिलांकरिता कार्य करणाऱ्या संस्थेला त्यांनी लाखो रुपयांची देणगी दान स्वरूपात प्रदान केली आहे. अनेक ठिकाणी वृद्ध महिलांना रक्त शिक्षणासाठी मुलं मुली दत्तक त्यांनी घेतलेली आहे. अमेरिका येथील एका समाजसेवी मंडळी करून त्यांनी वाशिम जिल्ह्यामध्ये अनेक गरजवंत मुलांना मुलींना शिक्षणाची संपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिली आज अनेक जण डॉक्टर व इंजिनियर झालेली आहे. काहींना लॅपटॉप उपलब्ध करून दिला. धार्मिक कार्यातही यांचा सक्रिय सहभाग आहे. अनेक भागवत कथा चे यशस्वी आयोजनासोबतच वेगवेगळ्या धार्मिक उपक्रमात हे सदैव अग्रेसर असतात तन-धनांनी यामध्ये ते सहभागी होतात. वारकरी मंडळी बाबत त्यांना नितांत आदर आहे. त्यांची सेवा ही ते करतात. कारंजा येथून शेगाव चे मोफत वारी आई वैकुंठ धामवासी सो.स्नेहलता सोमाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांनी अनेक वेळा घडवून आणली.सोमानी यांनी अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये संघर्ष करून, पत्रकारिता व प्रॉपर्टीच्या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी आज आपली ओळख निर्माण केली आहे त्या माध्यमातून आलेल्या मिळकतीतूनच व दानशूर लोकांच्या सहकार्याने मोठ-मोठे उपक्रम व कार्यक्रम त्यांनी आयोजित केलेले आहे. मोठमोठे कीर्तनकार प्रबोधनकार व सत्यपाल महाराज यांची सत्यवाणी त्यांनी अनेक वेळा आयोजित करून लोकांना प्रबोधन केले आहे. रक्तदान शिबिर, शेतकरी मेळावा, दिव्यांग शिबिर वृक्षारोपण, बेटी बचाव बेटी पढाव अभियान, उपक्रम, यांनी यशस्वी केली आहे. आदिवासी भागात कार्य त्यांचे अविरतपणे सुरू आहे, त्यांच्या कार्याची दखल केंद्र शासन व राज्य शासनासोबतच अनेक सामाजिक संघटनेने घेतलेली आहे व त्यांना वेगवेगळ्या पुरस्काराने सन्मानित सुद्धा करण्यात आले आहे. शासकीय निधी नाहीच... गत पंचवीस वर्षापासून तरुण क्रांती मंच या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी विविध विधायक उपक्रम राबवले ही संघटना मुळात नोंदणीकृत नाही. स्वतःचे खिशाला झळ व दानशूर यांच्या माध्यमातून त्यांनी या संघटनेच्या वतीने विधायक कार्य केलेले आहे .आज पर्यंत कोणताही नेत्यांकडून शासकीय निधी किंवा सीएसआर चा निधी त्यांनी घेतलेला नाही. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यालाही कुणाचाही निधी घेतलेला नाही.. पत्रकार यांचे राज्यस्तरीय अधिवेशन.. वाशिम येथे प्रथमच पत्रकारांचे राज्यस्तरीय अधिवेशन यशस्वीपणे त्यांनी आयोजित केले. केंद्रीय मंत्री समवेत अनेक संत मंडळी समाजसेवी ,पत्रकार बांधव ,श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी कार्यक्रमाला उपस्थित झाले. सदर कार्यक्रमाला दानशूर लोकांच्या सोबतच स्वतःचा खाजगी प्लॉट विकून त्यातील रक्कम या कार्यक्रमाला त्यांनी लावली. सदर कार्यक्रमात कोणत्याही केंद्रीयमंत्री यांनी निधी किंवा रुग्णवाहिका दिलेली नाही. जी रुग्णवाहिका आहे ती नामदार गडकरींच्या माध्यमातून मिळालेली आहे व त्याची सेवा अखंडितपणे सुरू आहे. व्यवसायाबद्दल अभिमान... लहानपणापासूनच निलेश सोमानी यांनी परिस्थितीनुसार व्यवसाय केले आहे. गावामध्ये चिंचोके ,कांचे ,कपडे विकण्याचे काम त्यांनी केले. त्यानंतर नोकरी केली, खाजगी बँकेमध्ये बारा वर्ष सेवा दिली. पत्रकारितेमध्ये सुद्धा दोन हजार रुपये मानधनावर त्यांनी काम केले. काम करताना कधीही कमकुवतपणा त्यांनी वाटू दिला नाही .जी सेवा मिळाली त्याला संधी समजून सोने केले. आज कोरोना नंतर पत्रकारिता क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे त्यामुळे पेपर चालविणे कठीण झाले आहे अशा परिस्थितीतही पत्रकारितेच्या माध्यमातून अनेकांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला. सोबतच स्वतःही त्यांनी माँ भारती ट्रॉफी हाऊस नावाने नवीन व्यवसाय सुरू केला ,याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे असे ते नेहमी सांगतात. जो व्यक्ती काम करायला लागतो तो कधीच पुढे जात नाही त्यामुळे व्यवसाय कोणताही असो त्यामध्ये निष्ठेने काम केले तर यश मिळते. आज मोठ्या संख्येने शासकीय किंवा खाजगी



निलेश भाऊचा कार्याला तोड नाही ,ते जे करतात ते सांगावे लागत नाही प्रत्यक्ष रूपी कार्य हीच त्यांची खरी ओळख आहे सत्य परेशान होऊ शकतो मात्र कधी पराजित होऊ शकत नाही हा त्यांचा ठाम विश्वास आहे त्यामुळेच ते अति जोमाने व सर्वांना सोबत घेऊन समाजसेवेचा हा भगीरथ रथ पुढे नेत आहे.. मागील दोन आठवड्यामध्ये प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रामध्ये मृत्युमुखी पडलेल्या पत्रकारांच्या कुटुंबीयांना व अपघातामध्ये जखमी झालेल्या पत्रकारांना मोठी मदत स्वतः व संघटनेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे.. सेवा हा त्यांचा यशाचा मंत्र आहे. प्रत्येक कार्यात त्यांच्या पत्नीची समर्थ साथ मिळत आहे वहिनी सुद्धा एका नामांकित वृत्तपत्राच्या जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहे सोबतच स्वतःच्या दैनिकाच्या मुख्य संपादकही आहेत. त्यांनी सुद्धा सामाजिक कार्याला वाहून घेतले असून शासनाचा पुरस्कारही त्यांना मिळालेला आहे सोबतच अनेक सामाजिक संघटनेने त्यांचा गौरव केला आहे. भाऊच्या कार्याला मानाचा मुजरा

कार्यक्रमांमध्ये त्यांच्या माध्यमातून ट्रॉफी मेडल पोचली आहे, मोठमोठ्या कार्यक्रमांमध्ये त्यांच्याकडे संस्था असो खाजगी असो सामाजिक कार्यकर्ता, महिला मंडळी असो ऑर्डर देत आहे हीच आमच्या कार्याची खरी ओळख असल्याचे ते अभिमानाने सांगतात.. आदिवासी भागात कार्य.. जवळपास वीस वर्ष त्यांनी मेळघाट व गडचिरोली आदिवासी भागात जाऊन सेवा दिली आहे लोकांना धान्य वाटप असो ,कपडे वाटप असो ,सोबतच आरोग्य शिबिर असो त्याच्या आयोजन केले . व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविला. अनेकांना व्यसनमुक्त केले, लग्नामध्ये सात फेऱ्यानंतर आठवा फेरा बेटी बचाव बेटी पढाव चा त्यांनी आरंभ केला जवळपास अडीचशे लग्न समारंभात त्यांनी नऊ दांपत्यांना आठवा फेरा देऊन शपथ दिली . सोबतच उपस्थित वऱ्हाडी मंडळींनाही शपथ दिली.. तालुकाध्यक्ष ते प्रदेशाध्यक्ष प्रवास... ग्रामीण भागातील धनज बू येथील निलेश सोमाणी यांनी ग्रामीण पत्रकारितेच्या माध्यमातून पत्रकारिता क्षेत्रात पदार्पण केले. आज स्वतःचे दैनिक, सोबत सर्वात जुन्या दैनिकाचे 20 वर्षापासून पासून वाशिम आवृत्ती संपादक, म्हणून सेवार्थ आहे. पत्रकार संघटनेमध्येही त ग्रामीण पातळीपासून त्यांनी सदस्य पासून सुरुवात केली. त्यानंतर त्यांच्या कार्याचा व्याप वाढत गेला . तालुकाध्यक्ष , जिल्हा सचिव,जिल्हाध्यक्ष, विभागीय अध्यक्ष, विदर्भ सचिव, विदर्भ अध्यक्ष, राज्य कार्यकारणी सदस्य हा प्रवास करीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी त्यांची निवड झाली आहे ही त्यांच्या कार्याची पावती आहे, अनेक पत्रकारांना त्यांनी आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. आजही ही सेवा अविरतपण करीत आहे त्याचा गाजावाजा नाही .मात्र सेवा सुरू आहे. कोरोना काळात त्यांनी जवळपास 40 कुटुंबीयांना दत्तक घेऊन लाखो रुपयांचे धान्य दर महिन्याला त्यांनी उपलब्ध करून दिली. काही महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला शिलाई मशीनचे वाटप केले, दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिभावांचा पुरस्कार देऊन चे सन्मान करतात. त्यामुळे सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला बळ मिळते हा त्यामागचा उद्देश आहे. सोबतच कोरोना काळा अनेकांना सॅनिटायझर मास्क चे वितरण केले होते, जेव्हा कोरोनामध्ये लोक घरी बसले होते त्यावेळेस भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून डॉक्टर आपल्या दारी हा उपक्रम त्यांनी राबवला वीस हजार त्यापेक्षा जास्त रुग्णांची तपासणी करण्यात आली मोफत औषधीचे वितरण करण्यात आले मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार शिखरचंद बाजरच्या यांच्या पुढाकाराने त्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. आपल्या गावी आयुर्वेदिक औषधीचे वितरण करण्याचा विक्रम ही त्यांनी प्रस्थापित केला. पाणी फाउंडेशन च्या माध्यमातून त्यांनी बी जे एस च्या माध्यमातून जे सी बी उपलब्ध करून दिले अनेक गावात गाव तलाव निर्माण झाले. आज प्रत्यक्ष रूपात या अभियानामुळे गावात पाणीटंचाई राहिली नाही.आजही अनेक गरीब कुटुंबांना ते आधार देत आहे, अनेक सामाजिक संस्थांची त्यांची जवळीक आहे जीवदयामध्येही त्यांचे मोठे काम आहे वीस वर्षापासून घरासमोर आलेल्या गाईंना ढेप स्वरूपात त्यांची सेवा सुरू आहे सोबतच मुक्या प्राण्यांना बिस्किटे सुद्धा तीन वर्षापासून देत आहे. सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. सामाजिक कार्याने आत्मिक समाधान मिळते अनेक मोठमोठ्या संतांच्या आशीर्वाद त्यांना मिळालेले आहेत हीच कार्याची खरी पावती असल्याचे ते आनंदाने सांगतात. सामाजिक कार्यासाठी त्यांना कुणाच्याही सर्टिफिकेटची गरज नाही कारण जेव्हा आपण आरशासमोर उभे होतो तेव्हा आपले प्रतिबिंब त्यामध्ये दिसत असतात. निष्काम निस्वार्थ भावनेने सेवा देत असल्याने त्यांना भगवंत, संत आशीर्वाद ,आईचा आशीर्वाद मिळत असून हीच त्यांची पुण्याई आहे. भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून त्यांनी वाशिम जिल्ह्यात सुजलाम सुफलाम अभियान राष्ट्रीय स्तरावर गाजविले, असंख्य गावात क्रांती झाली, स्वतःच्या गावालाही पाणी फाउंडेशन चा पुरस्कार मिळालेला आहे.जलतारा अभियानामध्ये त्यांनी आईच्या स्मृती पित्यर्थ एक लाख 11 हजार रुपयांची देणगी दिली सोबतच गावागावात जाऊन प्रबोधन करून लोकांना या चळवळीमध्ये सहभागी हावे याकरिता प्रोत्साहन दिले जलतारा उपक्रमाचा वाशिम जिल्ह्यामध्ये विश्वविक्रम झाला. वाशिमचे नारायण बाबा तलाव, एकभुर्जी प्रकल्प रुंदीकरण गाळ उपसणे त्यामध्ये त्यांनी सेवा दिलेली आहे .जवळपास 2000 त्यापेक्षा जास्त व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांनी लाखो युवकांना देशभक्तीचे धडे दिले आहे. जे करावं ते मनापासून करावं हाच त्यांचा मंत्र आहे. जेव्हा आपण चांगल्या मनाने काम करतो तेव्हा आपल्याला निश्चित यश मिळते ,भगवंत पाठीशी उभा राहतो यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. आज जे काही समाजसेवेचे कार्य सुरू आहे त्यामध्ये त्यांच्यावर विश्वास व्यक्त करणाऱ्या सर्व मंडळींचे आशीर्वाद आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साहेबांसारखे नेतृत्वांनी सुद्धा त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे त्यांना युवा गौरव म्हणून सन्मानित केले होते 51 हजार रुपये रोख रक्कम त्यांना त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेली आहे. शासनाच्या विविध समित्यावर ते सेवा देत आहे.. पत्रकारितेचा वापर ते सर्व सामान्यांच्या हिताकरिता करीत आहे .समाजातील गरजवंतांना मदत देण्यामध्ये जो आनंद मिळतो तो आनंद अन्य कुठे मिळू शकत नाही ही त्यांची भावना आहे आज मोठ्या संख्येने त्यांच्यासोबत उद्योजक मंडळी डॉक्टर मंडळी सामाजिक चळवळीतील मंडळी जुळलेली आहे.

# ‘पुरंदर कृषी एक्स्पो २०२६’चा दिमाखात समारोप

## बंपर लकी ड्रॉमध्ये सासवडच्या शेतकऱ्याला ट्रॅक्टर; हजारो शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सासवड : (स. गांवकरी)**

स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या ‘पुरंदर कृषी एक्स्पो २०२६’चा रविवारी (दि. २५ मे) उत्साहपूर्ण वातावरणात दिमाखदार समारोप झाला. चार दिवस चाललेल्या या कृषी प्रदर्शनाला पुणे जिल्ह्यासह राज्यभरातील हजारो शेतकरी, युवक आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली. या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या ‘बंपर लकी ड्रॉ’मध्ये सासवड येथील शेतकरी राजेश वसंत जगताप यांना ट्रॅक्टरचे बक्षीस मिळाले. दुसऱ्या क्रमांकाचे पावर ट्रीलर हे बक्षीस माळेगाव बु. (ता. बारामती) येथील सुरेश पांडुरंग चव्हाण यांनी जिंकले, तर तृतीय क्रमांकाचे पावर विडर हे बक्षीस सुनील ज्ञानोबा खटाटे यांना प्रदान करण्यात आले. याशिवाय चौथ्या दिवशीही विविध शंभर बक्षिसांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. समारोपप्रसंगी सहायक निबंधक सहकारी संस्था (पुणे जिल्हा) प्रकाश जगताप, सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, प्रदर्शनाचे मुख्य आयोजक व माजी आमदार संजय जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप, रमणिकलाल कोठडिया, अशोक वणवे, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, कात्रज डेअरीचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, निरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, लिना गायकवाड, सुनिता कोलते आदी मान्यवर उपस्थित होते.





प्रदर्शनामध्ये आधुनिक कृषी औजारे, प्रगत बियाणे, विविध खते, सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक उत्पादने तसेच नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती मिळावी, नव्या तंत्रज्ञानाची ओळख व्हावी आणि कृषी क्षेत्रात नव्या संधी निर्माण व्हाव्यात, हा उद्देश या प्रदर्शनामागे होता.

यासोबतच कुटुंबासह येणाऱ्या नागरिकांसाठी मनोरंजनाची आणि लहान मुलांसाठी खेळण्यांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे प्रदर्शनाला कृषी महोत्सवासारखे स्वरूप प्राप्त झाले होते. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप यांच्यासह आशिष गिरमे, रवींद्रपंत जगताप, शेखर जगताप, तुषार जगताप, अक्षय उरसळ, निलेश गुरव, संतोष गिरमे, संतोष सोनवणे, डॉ. मनोज शिंदे, बापू मगर, माऊली यादव, तुषार माहूरकर, सचिन कुंजीर, सागर चव्हाण, प्राचार्य नंदकुमार सागर, किशोर शिंदे, चेतन महाजन, अनिल उरवणे, ओंकार दळवी, स्वप्निल शिवरकर, वैभव शिंदे, राजेंद्र जाधव, मनोहर जगताप, अजित जगताप, राजन जगताप यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था, संत सोपानकाका सहकारी बँक आणि जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हा सहकारी उपनिबंधक प्रकाश जगताप म्हणाले, “मोठ्या शहरांमध्ये होणारे एक्स्पो ग्रामीण भागात भरवून ते यशस्वी करणे हे मोठे काम आहे. आयोजकांनी अत्यंत नेटके आणि सुंदर नियोजन केले. या प्रदर्शनातून शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान, उत्पादन प्रक्रिया आणि बाजारपेठेच्या संधींबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. आगामी काळात कृषी क्षेत्रात नवे प्रयोग घडवून आणण्यात या एक्स्पोचा मोठा वाटा राहील.” मुख्य आयोजक व माजी आमदार संजय जगताप यांनी सांगितले, “या चार दिवसीय कृषी प्रदर्शनाला शेतकरी आणि नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. प्रदर्शनाच्या यशासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आणि सहभागी शेतकऱ्यांचे मनःपूर्वक आभार.”

## 'केडगाव दगडफेक प्रकरण'

# दिवंगत आमदार अनिल राठोड यांच्यासह ६०० शिवसैनिकांची निर्दोष मुक्तता

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

केडगाव दुहेरी हत्याकांडानंतर झालेल्या दगडफेक आणि रस्ता रोको प्रकरणी दाखल गुन्ह्यातील सर्व ६०० आरोपींची न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. यामध्ये शिवसेनेचे दिवंगत माजी आमदार अनिल राठोड यांचाही समावेश आहे.

एप्रिल २०१८ मध्ये केडगाव येथे शिवसेनेचे उपशहर प्रमुख संजय कोतकर आणि कार्यकर्ते वसंत ठुबे यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडानंतर शिवसैनिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला होता.

हत्येच्या घटनेनंतर संतप्त जमावाने केलेली दगडफेक, रस्ता रोको, पोलिसांना शिवीगाळ, सरकारी कामात अडथळा आणणे आणि मृतदेहाची अवहेलना करणे यावरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अनिल राठोड यांच्यासह ६०० शिवसैनिकांवर गुन्हा दाखल झाला होता. सुरुवातीला पोलिसांनी या गुन्ह्यात सर्व आरोपींवर ‘सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न’ केल्याप्रकरणी भादंवि कलम 308 लावले होते. मात्र, नंतरच्या तपासात पोलिसांनी हे गंभीर कलम वगळून इतर वाढीव कलमे लावली होती. त्यामुळे गुन्ह्याचे गांभीर्य काहीसे कमी झाले होते.





या कारवाईनंतर आमदार अनिलभैय्या राठोड यांनी म्हटले होते की केडगावमधील दगडफेक शिवसैनिकांनी केली नसून, मारेकऱ्यांनी दहशत निर्माण करण्यासाठी आणि नातेवाईकांच्या आक्रोशातून ती झाली होती. शिवसेनेचा या दगडफेकीशी थेट संबंध नसताना पोलिसांनी खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप त्यांनी केला होता. दरम्यान, २०२० मध्ये करोना साथीच्या लाटेत राठोड यांचे निधन झाले. न्यायालयात खटला सुरू होता. आता निकाल आला असून सर्वांची सुटका झाली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## नालेसफाईच्या पार्श्वभूमीवर शैलेश पाटील यांचा अधिकाऱ्यांसह दौरा

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा शहरातील प्रभाग क्र. २७ मध्ये पावसाळापूर्व नालेसफाईच्या पार्श्वभूमीवर नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांचा अधिकाऱ्यांसह दौरा केला. ३१ मे २०२६ पूर्वी पालिकेने नालेसफाई पूर्ण करण्याची डेडलाईन दिली असून दिवा प्रभाग २७ मधील राहिलेली कामे व नियोजित कामे तात्काळ पूर्ण होण्याच्या दृष्टीने आज पाटील यांनी आपल्या प्रभागात ठाणे महापालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांच्या उपस्थितीत पाहणी दौरा केला. प्रसंगी दिवा प्रभाग क्र २७ मधील दिवा स्टेशन जवळील यशवंत नगर येथील साईराज टॉवर, ताराबाई, प्रेमनाथ, अर्जुन अपार्टमेंट तसेच समर्थ नगर येथील भारत शाळेजवळील रहिवासी इमारतींचा भाग आणि बि आर नगर येथील संयोग निवास, श्री प्रसाद इमारत, जानव्ही इमारत व इतर आजूबाजूच्या रहिवासी इमारती आणि चाळी येथील नालेसफाई व गटर सफाई कामांची पाहणी करून संबंधित ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समितीचे आरोग्य व स्वछता विभागातील श्री डोंगर परदेशीं (उप मुख्य स्वच्छता निरीक्षक), दिपक गुजराथी (स्वच्छता निरीक्षक) राजू भालेराव (मुकादम) तसेच निकिता सालप, दिवा शिवसनेचे संतोष हळदणकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## भिशी ग्रुप व मित्र मंडळाच्या वतीने अधिकमास निमित्त महाप्रसादाचे वाटप

अहिल्यानगर (स. गांवकरी) : निंबळक येथील धरमपूरी तीर्थक्षेत्र या ठिकाणी श्री गजानन महाराज यांच्या मूर्तीस महा अभिषेक करण्यात आला. तसेच प्रभू श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्तीस महा अभिषेक करून दुपारी बारा वाजता महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर भिशी ग्रुप व मित्रमंडळाचे वतीने अधिकमास निमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. धोंडा च्या पवित्र महिन्यानिमित्त या महाप्रसाद (भंडारा)च्या आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी इंजि.चंद्रकांत पुंड,इंजि. ज्ञानदेव शिरसाठ, कॅप्टन सुधिर पुंड, इंजि.पोपट शिंदे, इंजि. नवनाथ खेडकर, प्रा.दिलीप ठुबे, इंजि.बापू फुंदे, प्रा.मच्छिंद्र म्हस्के, इंजि. राधाकिसन घुले, विनायक साने, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, मंदिर, अर्चक, पुरोहित आयमाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे,विनोद पुंड,अनिल इवळे,भास्कर चौधरी,गणेश कोल्हे,सुधाकर कानडे आदी उपस्थित होते. चंद्रकांत पुंड म्हणाले,हिंदू धर्मात अधिक मास हा महिना पवित्र समजला जातो.अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.धरमपुरी हे तीर्थक्षेत्र अन्नदानाच्या धार्मिक कार्यात अग्रेसर आहे.मोठ्या प्रमाणात अन्नदान होत असल्याने धरमपुरी तीर्थक्षेत्र येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत आहे. धोंड्याच्या महिन्यात अन्नदानाला खूप महत्त्व आहे.या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे.



## नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील प्रतिबिंब संस्थेच्या वतीने व अहिल्यानगर जिल्हा ब्युटीपार्लर असोसिएशनच्या सहकार्याने दि.१० जून रोजी नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा(नववधू मेकअप स्पर्धा) ब्युटिशियन साठी घेण्यात येणार आहे, स्पर्धाचे हे ४ थे वर्षे आहे. स्टेशनरोड येथील यश ग्रँड हॉटेल येथे १० जून ला दुपारी १२ वा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या ब्युटिशियनला बेस्ट ब्युटिशन ऑफ ब्रायडल हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यामध्ये एकूण ३ क्रमांक काढण्यात येणार आहेत. स्पर्धकांनी कोणत्याही प्रकारची, जातीची, धर्माची नववधु बनवता येईल त्यासाठी मेकअपला १ तासाचा वेळ देण्यात येईल,कोणीही या स्पर्धेत भाग घेऊ शकते, ब्युटिशन आपल्याबरोबर एक असिस्टंट ठेवू शकते.सहभागी ब्युटिशनला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. ज्यांना या स्पर्धेत भाग घ्यायचा आहे त्यांनी प्रतिबिंब संस्था,स्टेट बँके समोर , दिल्लीगेट,अहिल्यानगर मोबाईल 9284930674 किंवा अनुजा कांबळे 9850262595, सायली मेहता 8087226246 वर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आदिम सांस्कृतिक ग्रंथालय वाचन, लेखन, संशोधनाचे केंद्र बनावे

### आमदार किरण लहामटे यांच्या हस्ते ग्रंथालयाचे उद्घाटन

अकोले : (स. गांवकरी)



मोबाईल आणि डिजिटल मनोरंजनाच्या वाढत्या प्रभावाच्या काळात आदिवासी समाजातील तरुण शिक्षक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन वाचन, चिंतन आणि सांस्कृतिक जतन संवर्धनाची चळवळ उभी केली आहे. सह्याद्री कोळी महादेव सांदण परिवार प्रतिष्ठानच्या कार्यालयासह 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालयाचे रविवारी अकोल्यात उद्घाटन झाले. हे ग्रंथालय आदिवासी समाजाच्या इतिहास, लोकपरंपरा, भाषा, कला, निसर्गपूरक जीवनशैली आणि पूर्वजांच्या ज्ञानपरंपरेचे जतन व संशोधन करणारे केंद्र म्हणून हे विकसित व्हावे, अशी अपेक्षा विविध वक्त्यांनी बोलून दाखवली केली.

सांदण प्रतिष्ठानच्या कार्यालयाचे उद्घाटन आमदार डॉ. किरण लहामटे व 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालय'चे उद्घाटन इतिहास संशोधक प्रा. डॉ. विलास गवारी हस्ते पार पडले. शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते भाऊसाहेब चासकर, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा.डॉ.नितीन तळपाडे, लेखक पी. सी. झांबाडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक व लेखक राजू ठोकळ अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमात आदिवासी कला, संस्कृती, भाषा, इतिहास, निसर्ग संवर्धन आणि निसर्गपूरक जीवनशैली या विषयांवर औचित्यपूर्ण चर्चा करण्यात आली. मोबाईलच्या युगात लहान मुले, तरुण तासन्तास रील्स, कॉमेडी व्हिडिओ आणि डिजिटल मनोरंजनात गेमिंगमध्ये गुंतून राहत असताना आदिवासी समाजातील तरुण शिक्षकांनी सांदण परिवारच्या माध्यमातून वाचन, चिंतन आणि समाजाच्या जीवनशैलीविषयी अभ्यासमंथनाची चळवळ सुरू केली आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

'आदिम ग्रंथालय' हे केवळ पुस्तकांचे संग्रहालय न राहता आदिवासी महादेव कोळी समाजातील पूर्वजांचे अनुभव, लोकपरंपरा, ज्ञान आणि सांस्कृतिक वारसा यांचे जतन, संवर्धन व संशोधन करणारे केंद्र बनावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. शाळाशाळांमधून विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करण्याची गरज यावेळी प्रतिपादन करण्यात आली.

आदिवासी संस्कृती ही निसर्गकेंद्री असून जंगल, डोंगर, नदी, पाऊस आणि शेती यांच्याशी आदिवासी समाजाचे अद्वैत नाते सांगताना आदिवासी भागातील शाळाशाळांमध्ये उत्तम वाचनालये उभी करणे, शाळा भौतिकदृष्ट्या समृद्ध करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली जोपासणे याची आवश्यकता वक्त्यांनी अधोरेखित केली. दरवर्षी उन्हाळ्यात अकोले तालुक्यातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये मोठ्या प्रमाणावर डोंगरांना आग लावली जाते. त्यामुळे जैवविविधतेचे अपरिमित नुकसान होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. या संदर्भात जनजागृती आणि संवेदनशीलता निर्माण करण्याची गरज मान्यवरांनी अधोरेखित केली.

यावेळी आदिवासी समाजातील पराक्रमी व्यक्तिमत्त्वे राघोजी भांगरे, रामा किरवा आणि लक्ष्मण खाडे यांच्यासह इतरांच्या चरित्रांचे पुस्तक स्वरूपात प्रकाशन वाचनालयाच्या माध्यमातून करण्यात यावे, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

सह्याद्री कोळी महादेव सांदण प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री.संजय गोडे सर व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'आदिम सांस्कृतिक ग्रंथालय' सुरू करण्यासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. बहुजन समाजातील विविध घटकांतील सुशिक्षित तरुण आपल्या इतिहास, कला, संस्कृती, निसर्ग आणि पर्यावरण यांविषयी संवेदनशीलपणे विचार करत असून त्यासाठी प्रत्यक्ष काम करत आहेत, ही स्वागतार्ह आणि प्रेरणादायी बाब असल्याचेही सांगण्यात आले. आमदार किरण लहामटे यांच्यासह प्रा. डॉ. विलास गवारी, भाऊसाहेब चासकर, प्रा. डॉ. नितीन तळपाडे, राजू ठोकळ यांची यावेळी भाषणे झाली. यावेळी शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सोमनाथ कातडे यांनी प्रास्ताविक केले सूत्रसंचालन विकास साबळे यांनी केले. यशवंत पारधी यांनी आभार प्रदर्शन केले. नवोदय व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. 5364 मीटर उंचीवरील एव्हरेस्ट बेस कॅम्प सर करणाऱ्या मनस्वी बांडे व आई वैशाली बांडे या मायलेकींचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

## 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' टप्पा-१ उत्साहात संपन्न

नाशिक कळवण : (स. गांवकरी)

आज दिनांक १५ मे २०२६ रोजी कळवण तालुक्यातील नवी बेज मंडळ येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर टप्पा-१ उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडले. शासनाच्या विविध योजना व नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर शिबिरासाठी कळवणचे तहसीलदार मा. श्री रोहिदास वारुळे साहेब, तालुका कृषी अधिकारी वाल्मीक प्रकाश, नायब तहसीलदार प्रज्ञा हिरे मॅडम, मंडळ अधिकारी मनीषा शिंदे उपस्थित होते. तसेच ग्राम महसूल अधिकारी अविनाश पवार, उमेश गोपनारायण, दुशांत गायकवाड, ग्राम महसूल सेवक कारभारी राऊत, शरद अहिरे, पंकज बच्याव, समाधान बच्याव व इतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष योगदान दिले. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी, विविध शाखांचे शाखाप्रमुख, शेतकरी संघटनेचे राज्याध्यक्ष श्री देविदास अण्णा पवार, कळवण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री धनंजय अण्णा पवार, अशोक दादा पवार, शितलकुमार आहिरे, रमेश रामकृष्ण बच्छाव, काकाजी मोतीराम बच्छाव, मधुकर जाधव, बाजीराव गुंजाळ, कृष्णा गणपत पाटील यांच्यासह नवी बेज मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, ग्राम महसूल सेवक, पोलीस पाटील, ग्रामसेवक, कृषी सेवक, आरोग्य सेवक व मंडळातील विविध गावांतील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भामरे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्राम महसूल अधिकारी अविनाश पवार यांनी मानले. या समाधान शिबिरातून नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेऊन तत्काळ मार्गदर्शन व शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

## मॅरिकोचा केस स्वच्छता क्षेत्रात दमदार प्रवेश

### 'पॅराशूट प्रगत प्रथिन शाम्पू'सह नवकल्पनाधारित विकास धोरणाला बळ

मुंबई : (स. गांवकरी)




भारतातील आघाडीच्या दैनंदिन वापराच्या वस्तू निर्माण करणाऱ्या कंपन्यांपैकी एक असलेल्या मॅरिकोने 'पॅराशूट प्रगत प्रथिन शाम्पू'च्या माध्यमातून केस स्वच्छता विभागात प्रवेश केला आहे. नारळ आणि नैसर्गिक घटकांच्या गुणधर्मांनी समृद्ध असलेली ही नवी उत्पादन श्रेणी कंपनीचे केस निगा क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत करणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

कंपनीचे भारत मुख्य व्यवसाय विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष गोपाल म्हणाले, "पॅराशूट प्रगत नारळाच्या गुणधर्मांसह केस स्वच्छतेसाठीचे हे उत्पादन सादर करणे हा आमच्या उत्पादन विस्तारातील महत्त्वाचा टप्पा आहे. नैसर्गिक उत्पादनांसाठी ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेऊन हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. भारतातील वैयक्तिक निगा क्षेत्राचे मूल्य दहा हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असून या क्षेत्रात नऊ ते दहा टक्क्यांनी वाढ होत आहे. या नव्या उत्पादनामुळे कंपनीला मोठ्या प्रमाणात वाढीच्या संधी उपलब्ध होतील." कंपनीचे भारत विभागाचे प्रमुख विपणन अधिकारी विक्रम करवाल यांनी सांगितले की, ग्राहक आता अधिकाधिक नैसर्गिक आणि विश्वासार्ह उत्पादनांकडे वळत आहेत. "भारतीय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या उत्पादनाचा प्रचार दूरचित्रवाणी, संगणकीय माध्यमे, निर्माते सहकार्य आणि प्रादेशिक माध्यमांतून केला जाणार आहे," असे त्यांनी नमूद केले. नवीन पॅराशूट प्रगत प्रथिन शाम्पू श्रेणीत नारळ, कोरफड, रोझमेरी, आवळा, शिकेकाई आणि बदाम यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश करण्यात आला आहे. ही उत्पादने केसांमधील प्रथिनांचे नुकसान कमी करण्यास, केस गळती रोखण्यास आणि केसांची चमक वाढवण्यास मदत करतात, असा दावा कंपनीने केला आहे.

कंपनीने खराब झालेल्या केसांच्या दुरुस्ती विभागातही या उत्पादनाद्वारे प्रवेश केला असून विविध ग्राहक गट लक्षात घेऊन आठ प्रकारांचे पॅक बाजारात आणले आहेत. एक रुपया किमतीच्या छोट्या पुडीपासून ते एक पूर्णांक दोन लिटरपर्यंत विविध आकारांमध्ये हे उत्पादन सर्वसाधारण विक्री केंद्रे, आधुनिक विक्री केंद्रे आणि संगणकीय खरेदी माध्यमांवर उपलब्ध करण्यात आले आहे. दरवर्षी लाखो घरांपर्यंत पोहोचणाऱ्या उत्पादन श्रेणींमध्ये विस्तार करण्यावर कंपनीचा भर असून उच्च दर्जाच्या उत्पादनांच्या वाढत्या मागणीचा फायदा घेण्याचे उद्दिष्ट मॅरिकोने ठेवले आहे. केस निगेवरील ग्राहकांचा खर्च वाढवण्यासाठी आणि या क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत करण्यासाठी कंपनीचा शाम्पू विभागातील हा प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे.

## कांद्याच्या हमीभावासाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवडमध्ये मविआचा शेतकरी क्रांती महामोर्चा, प्रति क्विंटल ३ हजार रुपये हमीभाव द्या

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीस भाजपाचे मोदी सरकार व फडणवीस सरकारच जबाबदार- हर्षवर्धन सपकाळ

नाशिक/मुंबई : (स. गांवकरी)



कांद्याला सध्या प्रति क्विंटल २००-३०० रुपये एवढा कमी भाव मिळत असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आजच्या विदारक परिस्थितीस भाजपाचे केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारच जबाबदार आहे, असा हल्लाबोल करत शेतकऱ्यांच्या कांद्याला भरीव हमीभाव मिळाल्याशिवाय काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी स्वस्थ बसणार नाही, सरकारला सळो की पळो करून सोडू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव मिळावा या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली येथे महाविकास आघाडीच्या वतीने शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आला. यावेळी रास्ता रोकोही करण्यात आला. या शेतकरी महामोर्चात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, शिवसेना (उबाठा) आमदार अंबादास दानवे, आमदार रोहित पवार, खा. शोभाताई बच्छाव, खा. भगरे गुरुजी, नाशिक ग्रामीण जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष भारत टाकेकर, रमेश कहांडोळे, नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलू खैरे तसेच महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रास्ता रोको आंदोलनादरम्यान पोलिसी बळाचा वापर करून नेत्यांना ताब्यात घेतले, मात्र शेतकऱ्यांचा संघर्ष दडपून टाकता येणार नाही. "सरकार हमसे डरती है, पुलिस को आगे करती है" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, महागाईने शेतकऱ्यांना जगणे, शेती करणे कठीण झाले आहे, शेतमालाला हमीभाव मिळत नाही.

## २८ मे रोजी 'दि केरला स्टोरी 2' चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर

पुणे : (स. गांवकरी)




"आता ही कथा फक्त सांगितली जाणार नाही... तर ती अनुभवलीही जाणार आहे." देशभर चर्चेत राहिलेला आणि आपल्या प्रभावी कथनशैलीने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा 'दि केरला स्टोरी 2' आता झी सिनेमावर आपल्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरसाठी सज्ज आहे. सत्य घटनांवर आधारित हा चित्रपट समाजातील एका संवेदनशील विषयावर ठाम आणि प्रभावी दृष्टिकोन मांडतो. ही रोमहर्षक आणि विचार करायला लावणारी कथा पहा ह्या गुरुवारी, 28 मे रोजी रात्री 8 वाजता फक्त झी सिनेमा वर. कामाख्या नारायण सिंग दिग्दर्शित आणि विपुल अमृतलाल शाह निर्मित या चित्रपटात उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा, अदिती भाटिया, सुमित गहलावत, अर्जन सिंह औजला, युक्तम खोसला आणि अलका अमीन यांनी भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या दमदार अभिनयासोबतच चित्रपटाच्या प्रभावी आणि ठाम कथनशैलीमुळे तो अलीकडच्या काळातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे. 'दि केरला स्टोरी 2' हा चित्रपट हे उलगडण्याचा प्रयत्न करतो की कसा प्रेमाचा वापर करून महिलांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला जाऊ शकतो. हा चित्रपट कुटुंबांसाठी एक व्यापक इशारा देतो. हा चित्रपट भारतातील विविध राज्यांतील तीन तरुणींची कथा मांडतो, ज्या खऱ्या प्रेमाच्या शोधात आपल्या कुटुंबाविरुद्ध जातात, पण पुढे फसवणूक, विश्वासघात आणि अत्याचारांच्या जाळ्यात त्या अडकतात. काय फार उशीर व्हायच्या आधी त्या ह्या भयानक परिस्थितीतून बाहेर पडू शकतील?

## "आनंद पथ रस्ता आरोग्याचा" उपक्रम उत्साहात

ठाणे : (स. गांवकरी)



आयोजक नगरसेवक राजेश मोरे

आनंद पथ, रस्ता आरोग्याचा हा विशेष उपक्रम श्री. राजेश मोरे नगरसेवक, ठाणे महानगरपालिका व सौ. रुचिता मोरे मा. नगरसेविका यांच्या प्रेरणेतून ठाणे महानगरपालिका, ठाणे वाहतूक पोलीस यांच्या सौजन्याने कोकण मराठी साहित्य परिषद, युवाशक्ती आयोजित काव्यानंद हा कविता वाचनाचा कार्यक्रम रविवार, २४ मे २०२६ रोजी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत पार पडला. काव्यानंद कार्यक्रमाचे नियोजन राजेंद्र गोसावी काव्यानंद समनव्यक व स्नेहा वाघ कोकण मराठी साहित्य परिषद युवाशक्ती प्रमुख, उत्तर कोकण प्रांत यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुकूल माळी ह्यांनी केले. हास्य, आनंद, प्रेम, विरह, विद्रोह अशा अनेक विषयांच्या कवितांनी काव्यानंद कार्यक्रम रंगला. युवा ते जेष्ठ अशा एकूण २० कवींनी आपल्या आवडत्या व स्वलिखित कविता कार्यक्रमात सादर केल्या. या कार्यक्रमास श्री. राजेश मोरे नगरसेवक, ठाणे महानगरपालिका, वयम मासिकाचे प्रकाशक श्रीकांत बापट व संकल्प शाळेचे संस्थापक राज परब यांची उपस्थिती लाभली. अनेक रसिक मंडळी पाऊस असूनही कविता ऐकायला आले होते. त्यामुळे काव्यानंद हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने आनंदाने बहरला.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/५१/२०२६ अकोले दि. १०/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. पोपट सखाराम वायळ, रा. करंडी, रा.अकोले,** ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतः पोपट सखाराम वायळ यांचा जन्म दि. ०१/०६/१९७० रोजी करंडी** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय करंडी** यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. पोपट सखाराम वायळ, रा. करंडी,** ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः पोपट सखाराम वायळ यांचा जन्म दि. ०१/०६/१९७० रोजी करंडी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय करंडी,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १०/०४/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

कामगिरी क्लर्क

हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

**अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर**

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी,अ.नगर. २३२६९१४

जा. क्र. पतसंस्था फेडरेशेन २६७/ सन २०२६ दिनांक : ०७/०५/२०२६

**स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहिरनामा**

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा.जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहिर लिलावाने विक्री करित आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिनाणाऱ्यांनी नमुद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा.रक्कम | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु पै | वसुली दा.रक्कम | | | |
| | | | | | | | पुर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
| १ | कर्ज - सुरेश अदिनाथ भोरे यांची मिळकत<br>जामि - अशोक निवृत्ती नेहरकर | देवदैठण<br>देवदैठण<br>देवदैठण<br>ता.जामखेड | ३६५०२९/-<br>+ होणारे व्याज+ इतर खर्च | २९१/१ पैकी<br>३४२ पैकी<br>३४६ पैकी | ०.०४ पैकी<br>०.५२०० पैकी<br>०.९६ पैकी | ०.०४<br>१.३७<br>१.३१ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| २. | कर्ज- पंढरीनाथ हरिभाऊ महारनवर यांची मिळकत | धामणगाव<br>ता.जामखेड | ३८२६५/-<br>+ होणारे व्याज+ इतर खर्च | ३९२/१ पैकी | ०.१२.०० पैकी | ०.१२ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |

**लिलावाचे ठिकाण व वेळ : https://eauction.gov.in** या सांकेतिक स्थळावर **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर.दि.०६/०६/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता.** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पंतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

**लिलावाच्या दिवशी दि.०६/०६/२०२६** रोजी लिलावात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं.२ दि.०६/०७/२०२६ रोजी सकाळी :११.३०वाजता** संस्थेच्या कार्यालयात होईल. तसेच या ही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किमंत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि.०६/०८/२०२६ रोजी सकाळी :११.३० वाजता https://eauction.gov.in** या सांकेतिक स्थळावर **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित,जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक :- ०७/०५/२०२६

(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

# संजयनगर परिसरातील अतिक्रमणांवर हातोडा!



**कोपरगाव : (स. गांवकरी)**

कोपरगाव शहरात गोवंश हत्या प्रतिबंधासाठी नगरपरिषद प्रशासन आणि पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे मोठी कारवाई करत संजयनगर परिसरातील संशयित अतिक्रमणांवर कारवाई केली. सुमारे दोन तास चाललेल्या या मोहिमेत कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. त्यामुळे प्रशासनाच्या या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. कोपरगाव शहरात

## कोपरगावात गोवंश हत्या प्रतिबंधासाठी पालिका व पोलिसांची संयुक्त कारवाई

गोवंश हत्येचे प्रकार वारंवार समोर येत असल्याने प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. दोन दिवसांपूर्वी आयेशा कॉलनी परिसरात झालेल्या कारवाईत आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी गोवंश जप्त करून पुढील तपास सुरू केला होता.

यानंतर नगरपरिषद आणि पोलिस प्रशासनाने संबंधितांना नोटिसा बजावून सकाळी मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुहास जगताप आणि पोलिस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांच्या नेतृत्वाखाली पोलिस, राखीव पोलिस दल, महिला पोलिस कर्मचारी तसेच पालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. दोन जेसीबी, ट्रॅक्टर आणि डंपरच्या सहाय्याने अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. शहरात गोवंश तस्करी आणि अवैध कत्तल रोखण्यासाठी राज्य शासनाने कठोर निर्देश दिले असून संघटित गुन्हेगारी स्वरूपातील प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच नागरिकांनी संशयास्पद प्रकारांची माहिती संबंधित यंत्रणांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, पालिका प्रशासनाने जनहितासाठी कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असल्याचे स्पष्ट केले असून या कारवाईमुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे.



ठाणे : गावदेवी भाजी मंडई येथे गुरुवारी लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी भाजी मंडई येथे पाहणी केली. गावदेवी भाजी मंडई येथे लागलेली आग ही मोठ्या प्रमाणात लागल्याने नुकसानही बरेच झाले आहे. या ठिकाणच्या गाळेधारकांना 1 जून पर्यंत पुनर्वसन करण्यात येईल असे सांगितले होते, परंतु आज प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कामाचा आवाका हा मोठ्या प्रमाणात असून काम हे तांत्रिक दृष्ट्या करण्याच्या दृष्टीकोनातून आणखी काही कालावधी लागेल व सुस्थितीतील गाळे येथील गाळेधारकांना देण्यात येतील असे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी नमूद केले. या पाहणी दौऱ्यास सभागृह नेते हणमंत जगदाळे, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक राम रेपाळे, स्थानिक नगरसेवक संजय वाघुले, सुनेश जोशी, नगरसेविका मृणाल पेंडसे, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मधुकर बोडके, डॉ मिताली संचेती, उपनगर अभियंता शुभांगी केसवाणी, सहायक आयुक्त महेशकुमार जामनोर, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीष झळके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### १० अवैध दारू विक्रेत्यांवर व १ जुगार अड्ड्यावर कारवाई; मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर (स. गांवकरी) : मुम्मका सुदर्शन, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचे आदेशान्वये पोनि/श्री. किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली दि.२४ मे ते दि. २५ मे २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैध धंदयाची माहिती काढुन कारवाई करणे कामी स्थानिक गुन्हे शाखेने ४ पथके तयार करुन कारवाई करणे कामी रवाना केले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने श्रीगोंदा, कोपरगाव तालुका, नेवासा, बेलवंडी, राहुरी, लोणी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू विक्रेत्यांची व अवैध जुगार चालणारे ठिकाणाची माहिती काढुन ११ ठिकाणी छापे टाकुन कारवाईमध्ये १० अवैध दारू विक्रेत्यांविरूध्द व १ अवैध जुगार खेळणा-याविरुध्द पोलीस स्टेशनला एकुण ११ गुन्हे दाखल केले असुन ७६,४७०/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये कोठेही अवैध धंदे चालु असल्यास स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर येथील फोन नंबर 0241-2416111, डायल 112 यावर कळविणे बाबत नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

### लग्नकार्यासाठी नेलेले साडेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने हडप

अहिल्यानगर (स. गांवकरी) : लग्नकार्यात घालण्यासाठी विश्वासाने नेलेले चार लाख ९० हजार रूपये किमतीचे सुमारे साडेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने परत न करता, त्याचा अपहार केल्याचा प्रकार नागापूर परिसरातील पितळे कॉलनी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एका महिलेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनिता परसराम नवले (वय ३३ रा. पितळे कॉलनी, नागापूर) यांनी रविवारी (२४ मे) फिर्याद दिली आहे. अनिता गणेश नजन (हल्ली रा. गणेश पार्क, गणेश चौक, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपी महिलेचे नाव आहे. फिर्यादी वनिता नवले यांनी त्यांच्या घराशेजारी पूर्वी राहणारी अनिता नजन या ओळखीच्या महिलेवर विश्वास होता. तिने लग्नकार्यात घालण्यासाठी दागिने हवे असल्याचे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन करत त्यांच्याकडून दोन तोळे वजनाची सोन्याची पोत, १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले फुल आणि वेल, तसेच ५ ग्रॅम वजनाची सोन्याची ठुसी असे सोन्याचे दागिने नेले होते. हे दागिने घेतल्यानंतर अनिता नजन हिने ते परत न करता सोन्याचा अपहार केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडित महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद नोंदवली आहे. ही घटना १५ ते २२ मे दरम्यान घडली आहे. पोलीस अंमलदार गणेश चौधरी अधिक तपास करीत आहेत.



### उपसरपंचपदी सौ. सुरेखा खंडागळे यांची बिनविरोध निवड

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील सुरेशनगर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सौ.सुरेखा अशोक खंडागळे यांची ठरलेल्या रोटेशनप्रमाणे बिनविरोध निवड करण्यात आली आहे.लोकनियुक्त सरपंच सौ.शैलाताई कल्याणराव उभेदळ यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामपंचायत चे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची निवड करण्यात आली. यावेळी झालेल्या उपसरपंच पदाच्या निवडीच्या प्रसंगी सौ. सुरेखा खंडागळे यांच्या उपसरपंच पदाची सूचना ग्रामपंचायत सदस्य भाकचंद पाडळे यांनी मांडली त्यास उपस्थित ग्रामपंचायत सदस्य सुवर्णा सतीश क्षीरसागर, मैनाबाई नाथा बाबर,विनोद निकाळजे यांनी हात वर करून अनुमोदन दिले. उपसरपंचपदी सौ.सुरेखा खंडागळे यांची निवड झाल्यावर लोकनियुक्त सरपंच सौ.शैलाताई उभेदळ यांच्या हस्ते हार शाल श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला.गावच्या विकासासाठी हातात हात घालून व सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन सरपंच सौ.शैलाताई उभेदळ यांच्या मार्गदर्शनाखाली आपण गावच्या विकासासाठी काम करू अशी ग्वाही सौ.सुरेखा खंडागळे यांनी यावेळी बोलतांना दिली. यावेळी झालेल्या उपसरपंच पदाच्या निवडी प्रसंगी माजी सरपंच भगवानराव दळवी,बबनराव शेटे, अशोक साळुंके,जिजाबा उभेदळ,शिवाजी वाळके,नाथा बाबर,सतीश क्षीरसागर,फिलिप दळवी,अजय बाबर,हर्षद पाटील,प्रसाद पाषाण,अविनाश दळवी,अमोल खंडागळे, आकाश भोसले,सुनील सुरोशे,अक्षय शेगर,जालिंदर खंडागळे,अशोक खंडागळे,अजय पिटेकर,सागर खंडागळे,युवा नेते विजय उभेदळ,सचिन गोरे,ग्रामसेवक राजेंद्र जाधव उपस्थित होते

# ५० वर्षाची मित्र मैत्रिणीची अनोखी भेट

**जुन्नर तालुका : (स. गांवकरी)**

रविवार दि. २४ मे रोजी चेतन्य विद्यालय ओतूरचें १९७५ च्या ऐस. ऐस सी च्या वर्गातील सहकारी मित्रांचा स्नेहमेळावा पार पडला.सदर मेळावा तळेगाव येथे सुरेश घुले व विलास घुले यांचे तळेगाव येथील द्वारकामाई हॉस्टेल मधे पार पडला.



मेळाव्याचे आयोजन श्रीकांत डुंबरे,दिपक तांबे सुशीला गावडे,सुभाष डुंबरे, दिलीप घोलप,विक्रम अवचट व इतरांनी केले. विलास घुले व सुरेश घुले यांनी पूजन करून मेळाव्याची सुरुवात झाली. सूत्रसंचलन पद्मा हांडे यांनी केले राजू भोर यांनी मयत सभासदां ना श्रद्धांजली वाहिली. मेळाव्याच्या सुरवातीलाच सुशीला गावडे व सुरेखा हांडे यांनी छान नृत्यातून गाणे गाऊन सर्वांची मने जिकली. पुष्पा तांबे, मालती फाकटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या मेळाव्याची जागा व सर्व जेवण व्यवस्था श्री घुले बंधू यांनी खूपच छान केली होती त्यांचा सत्कार करण्यात आला सरोदे सर,भरत शहा, दिलीप वाणी,सुभाष डुंबरे,डॉ रमेश शेटे,दिलीप घोलप,विक्रम आवचट व इतरांनी केला घुले यांचा सत्कार सुशीला गावडे प्रातिभा कांनडे पुष्पा तांबे व इतर सहकारी यांनी केला दुपारी श्री घुले परिवाराने सुंदर सुरुची जेवण ठेवले होते.घुले परिवाराचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.त्यांनी सर्वांना भेट वस्तू देऊन आपला आनंद व्यक्त केला व खूपच आनंदाने सर्वांचे स्वागत केले. हा पाचवा मेळावा या मेळाव्याच्या निमित्ताने ६७,६८ वर्षाचे हे सर्व मित्र मैत्रिणी ऐकत्र येऊन जुन्या आठवणी जागवतात ऐकमेकांची सुख- दुःखे शेअर करतात, ऐकमेकांच्या टिंगल टवाळी करतात,फणी गेम,गप्पागोष्टी यातच सम्पूर्ण अनोखा दिवस घालवतात.अशा प्रकारे सर्वांनी च या मेळाव्याचा आनंद घेतला. खूपच सुंदर मेळावा पार पडला. मेळाव्याची सांगता श्रीकांत डुंबरे यांनी आभार प्रदर्शन करून केली.

# सुदर्शन शिखर मोहिमेसाठी जुन्नरच्या निखिलची निवड

**जुन्नर तालुका: (स. गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील युवा गिर्यारोहक निखिल किसन कोकाटे याची उत्तराखंडमधील अत्यंत आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या सुदर्शन शिखर आरोहण मोहिमेसाठी निवड करण्यात आली आहे. Indian Mountaineering Foundation (IMF) यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय मोहिमेसाठी देशभरातील अनुभवी,निवडक गिर्यारोहकांमधून निखिलची निवड झाली असून,ही जुन्नर तालुक्यासह संपूर्ण आदिवासी व ग्रामीण भागासाठी अभिमाना ची बाब मानली जात आहे. उत्तराखंडमधील गंगोत्री नॅशनल पार्क परिसरातील ६५२९ मीटर (२१,४२१ फूट) उंचीच्या सुदर्शन शिखरावर ही मोहीम पार पडणार आहे. गढवाल हिमालयातील हे शिखर तांत्रिकदृष्ट्या अत्यंत कठीण मानले जाते.१० जूनपासून सुरू होणारी ही २४ दिवसांची मोहीम ४ जुलैपर्यंत चालणार असून १० सदस्यीय संघात निखिलचा समावेश करण्यात आला आहे. निखिलने यापूर्वी Mount Kilimanjaro, युनाम, शिन कुण आणि ब्लॅक पीक यां सारख्या शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे. बेसिक व ॲडव्हान्स माउंटेनिअरिंग कोर्स पूर्ण केलेला निखिल ग्रामीण व आदिवासी युवकांमध्ये गिर्यारोहणाबाबत जागरूकता निर्माण करण्या साठी कार्यरत असून भविष्यात Mount Everest सर करण्याचे त्याचे स्वप्न आहे.



# प्रेरणादायी भेट : "उच्च पदस्थ साधी माणसं




**आळंदी : (स. गांवकरी)**

ससून जनरल हॉस्पिटल चे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लाप्पा जाधव यांना भेटण्याचा योग आला. या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन भारती त्यांच्या सोबत उपस्थित होते. मोठ्या पदावर, अधिकाराच्या स्थानावर आणि प्रतिष्ठित भूमिकेत असूनही स्वभावाने अत्यंत नम्र, साधेपणाने वागणारी व सर्वसामान्य लोकांशी आपुलकीने संवाद साधणारी व्यक्ती म्हणजेच जाधव साहेब, याची प्रचिती आजच्या भेटीत प्रकर्षाने आली. आपल्या अत्यंत व्यस्त दैनंदिन कामकाजातून वेळ काढून त्यांनी धानोरे शाळेचा उल्लेख होताच शाळेविषयी सविस्तर चर्चा केली. शाळेत दिल्या जाणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षणा बरोबरच विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास शिक्षण किती महत्त्वाचे आहे, हेही त्यांनी अत्यंत समर्पकपणे पटवून दिले. ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये गुणवत्तेसह अद्ययावत भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे गजानन पाटील यांचे सातत्याने सुरू असलेले प्रयत्न या विषयीची माहितीही त्यांनी आवर्जून जाणून घेतली. भेटी दरम्यान लवकरच धानोरे शाळेला भेट देण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या साधेपणाने, सकारात्मक विचारांनी आणि शिक्षणाविषयीच्या तळमळीने ही भेट निश्चितच प्रेरणादायी ठरली असल्याचे आदर्श शाळा धानोरेचे मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे यांनी सांगितले.

# समर्थ शैक्षणिक संकुलात 'डिप्लोमा प्रवेश मार्गदर्शन व सुविधा केंद्रा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जुन्नर तालुका : (स. गांवकरी)**




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे येथे शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ साठी डिप्लोमा प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिये अंतर्गत 'प्रवेश मार्गदर्शन व सुविधा केंद्र' सुरू करण्यात आले असून,या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याची माहिती प्राचार्य डॉ.अनिल कपिले यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली समर्थ पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्या ने विविध शैक्षणिक,तांत्रिक व करिअराभिमुख उपक्रमराबविले जात आहेत.विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांमध्ये रोजगा राच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने विशेष प्रयत्नशील असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेची अंतिम मुदत २२ जून असून,या सुविधा केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना शाखा निवड,ऑनलाइन अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी तसेच प्रवेश प्रक्रिये बाबत तज्ज्ञांचे सविस्तर मार्गदर्शन दिले जात आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेनुसार व आवडीनुसार योग्य शाखेची निवड करून भविष्यातील करिअरची भक्कम पायाभरणी करावी,तसेच अधिकाधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षणाची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे प्रवेश समन्वयक प्रा. संजय कंधारे यांनी सांगितले. समर्थ पॉलिटे क्निकमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग,कॉम्प्युटर इंजिनिअरिंग,इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (IT), इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग,इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग,मेकॅट्रॉनिक्स तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग या अत्याधुनिक व रोजगाराभिमुख शाखांमध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. सदर विद्यार्थी सुविधा केंद्र प्राचार्य डॉ.अनिल कपिले व उपप्राचार्य प्रा.संजय कंधारे प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. श्याम फुलपगारे,शैक्षणिक समन्वयक प्रा. स्वप्नील नवले यांच्या नेतृत्वाखाली प्रिया सुपेकर,रूपाली हर्दे,साक्षी जाधव,दिपाली पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे राबविण्यात येत आहे. एकाच ठिकाणी प्रवेशा संदर्भातील सर्व माहिती, मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध होत असल्याने विद्यार्थी व पालकांकडून या सुविधा केंद्राचे विशेष स्वागत होत आहे.

# शिवसैनिकांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून त्यांच्यावर दबाव आणण्याचे प्रकार

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांचे नाव वापरून खोटा बनाव रचत गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे. शहरात शिवसैनिकांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून त्यांच्यावर दबाव आणण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (दि. २६ मे) जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती तपासली जाईल तसेच विनाकारण कोणालाही त्रास दिला जाणार नाही, असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, दिलीप सातपुते, विक्रम राठोड, नगरसेवक दत्तात्रय कावरे, अभिषेक भोसले आदी उपस्थित होते. योगेश चंद्रकांत गलांडे हे सावेडी गाव येथील संघर्ष चौक परिसरात वास्तव्यास असून नवनागापूर येथे त्यांचे कार्यालय आहे. ते स्वराज्य कामगार संघटनेचे सचिव तसेच युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून कंपन्या व कामगार यांच्यात समन्वय साधण्याचे काम ते करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गलांडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, एमआयडीसी परिसरात कंत्राटदार म्हणून काम करणारा चिरंजीव दत्तात्रय गाढवे हा विविध कंपन्यांतील अधिकारी व सुपरवायझर यांना धमकावून त्रास देत असून, त्याच्यावर खंडणी व धमकावण्याचे गुन्हे दाखल आहेत. दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी सनफार्मा चौकात गाढवे याने गाडी आडवी घालत रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप गलांडे यांनी केला असून त्याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक 958/2025 दाखल करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यानंतर गाढवे याने न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. जामिनाला विरोध करू नये यासाठी धमक्या देण्यात आल्याने एनसी क्रमांक 112/2026 दाखल करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर त्याने अटींचे पालन न केल्यामुळे त्याच्याविरोधात जामीन रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.

याच पार्श्वभूमीवर स्वतःवरील गुन्हे मागे घेण्यासाठी गाढवे हा सातत्याने खोट्या घटना सांगून गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप गलांडे यांनी केला आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये कथित घटनांबाबत कोणतीही सत्यता आढळून न आल्याने कारवाई झाली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

निवेदनात म्हटले आहे की, दि. १७ मे २०२६ रोजी तोफखाना पोलीस स्टेशन येथे देखील खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये त्यांच्यासह मुलगा, पुतण्या, भाऊ आणि शंकर शेळके यांना गोवण्याचा प्रयत्न झाला. मात्र कथित घटनेच्या वेळी संबंधित सर्वजण घरी असल्याचे सीसीटीव्ही फुटेज व अन्य पुरावे पोलिसांकडे सादर करण्यात आले आहेत. तसेच दि. २४ मे रोजी घडलेल्या घटनेतही आपला किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांचा कोणताही संबंध नसताना मुद्दाम नाव घेतल्याचा आरोप गलांडे यांनी केला आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ गौरवमहोत्सवी वर्ष वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code 5480

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा



## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अॅण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अॅक्युपंक्चर, मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे अॅक्यूपंक्चर कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन अॅक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अॅक्युपंक्चरिस्ट
- अॅक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

# थोडक्यात पण महत्वाचे



## आळंदी संस्थान कोणालाही पाठीशी घालणार नाही - अॅड उमाप

आळंदी (स. गांवकरी) : माऊली मंदिरातील देणगी पेटीतील रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्या नंतर आळंदी संस्थानने तात्काळ संबंधित आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यास तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे आळंदी संस्थान या प्रकरणी कोणालाही पाठीशी घालणार नसल्याचे पालखी सोहळा प्रमुख अॅड राजेंद्र उमाप यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. माऊली मंदिरातील भक्त निवासात आयोजित पत्रकार परिषदेत मंदिरातील वारुळे घटने बाबत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेस प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक माऊली वीर, आळंदी ग्रामस्थ पदाधिकारी नंदकुमार कुऱ्हाडे पाटील, डी. डी. भोसले पाटील, विलास घुंडरे पाटील, रामदास भोसले, संकेत वाघमारे आदी उपस्थित होते. अॅड उमाप म्हणाले, आळंदी संस्थान कोणालाही याप्रकरणी पाठीशी घालणार नाही इतर चार जणांवर खुलासा करण्यासाठी नोटिसा देण्यात आले आहेत यामध्ये व्यवस्थापक व्यवस्थापक उपव्यवस्थापक लेखापाल आणि अन्नदान विभाग प्रमुख यांचा समावेश आहे त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे माऊली मंदिरातील कर्मचारी सेवक यांच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यात येणार असून सुरक्षा व्यवस्था, कर्मचारी सेवा या बाबत कडक नियमावली संस्थानने जाहीर केली असून प्रभावी उपाय योजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नायका फॅशनकडून ईदसाठी आकर्षक आणि देखणे पेहराव पर्याय

पुणे (स. गांवकरी) : नायका फॅशनच्या 'ईद-अल-अजहा विशेष संग्रहा'मुळे यंदाच्या ईद पेहरावाला हलकं, देखणं आणि आकर्षक रूप मिळालं आहे. ईदनिमित्त दिवसभर नातेवाईकांच्या भेटीगाठी, खास क्षण आणि छायाचित्रण यामुळे सणासुदीचा तसेच आरामदायी पोशाख निवडण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. यंदा फिकट गुलाबी, सौम्य हिरवा आणि गडद रत्नछटांतील रंग विशेष लोकप्रिय ठरत आहेत. हलके कापड, नाजूक भरतकाम आणि मोकळ्या आकारातील पोशाख यांना ग्राहकांकडून अधिक पसंती मिळत आहे. गजरा गँग, लिखा आणि सीरत यांसारख्या वस्त्रनिर्मिती संस्थांच्या साड्या, कुर्ता संच, घेरदार पोशाख तसेच जुळ्या पोशाखांच्या पर्यायांमध्ये आकर्षकता आणि आरामदायीपणाचा उत्तम समतोल दिसून येत आहे. सहज परिधान करता येणारे आणि दिवसभर आरामदायी वाटणारे हे पोशाख ईद उत्सवासाठी विशेष लक्ष वेधून घेत आहेत. पुरुषांसाठीही एकसंध रंगछटांतील कुर्ते आणि उठावदार बंदगळा पोशाख आकर्षण ठरत आहेत. पारंपरिकतेसोबत आधुनिकतेचा संगम साधणाऱ्या या शैलींना तरुणांकडून विशेष प्रतिसाद मिळत आहे. ईदचा सणासुदीचा देखावा अधिक खुलवण्यासाठी झुमके, मोत्यांच्या नक्षीकामाच्या छोट्या पिशव्या आणि कुंदन अलंकारांना मोठी मागणी आहे. पारंपरिक आणि आधुनिक शैलीचा सुंदर मिलाफ असलेला हा संग्रह यंदाच्या ईद साजरीकरणासाठी उत्तम पेहराव पर्याय ठरत आहे.

## अंतिम सामन्यांसाठी सोशल दुसरा स्टेडियमसह सज्ज



पुणे (स. गांवकरी) : क्रिकेटचा सर्वांत मोठा हंगाम अंतिम सामन्यापर्यंत पोहोचत असताना सोशल ने मॅच डे डेस्टीनेशनचा अनुभव देण्यासाठी दुसरास्टेडियम उपक्रम ग्राहकांसाठी पुन्हा आणला आहे. याअंतर्गत भारतभरातील विविध आउटलेट्स मध्ये चाहते मोठ्या स्क्रीनवर फायनलचा थरार अनुभवू शकतील. क्रिकेट-थीम डेकोर, जल्लोषमय वातावरण, सामन्याचा रोमांच आणि प्रत्येक चौकार, विकेट व शेवटच्या षटकातील थरार अधिक भव्य बनवणारा सामूहिक उत्साह यामुळे हा अनुभव अविस्मरणीय ठरणार आहे.याचबरोबर देशभरातील प्रसिद्ध प्रादेशिक चवींपासून प्रेरित खास मॅच-डे मेनूसह चाहत्यांसाठी अधिक रंगतदार अनुभव घेऊन आले आहे.या मेनूमध्ये अनेक लोकप्रिय पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये राजस्थान बॅलेस्टिक भजियाज,हैदराबाद ओजी हलिम बिर्याणी,लखनौ भारवान गलौटी,बंगळुरू ओजी स्टेडियम सामोसा,पंजाब सिक्सर छोले भटोरे,गुजरात फरसाण प्लॅटर,मुंबई वडा प्लॅटर,दिल्ली मॅच मोमोज,कोलकाता फिले-ओ-फिश बर्गर यासारख्या चविष्ट पदार्थांचा समावेश आहे.दुसरा स्टेडियम 2026 अनुभव हा पुणे,मुंबई,दिल्ली-एनसी आर,बंगळुरू,हैदराबाद,कोलकाता,लखनौ, चंदीगड आणि देहरादून मधील सोशल आऊटलेटसमध्ये मिळणार आहे.

## ओबेन इलेक्ट्रिकच्या विस्ताराला वाढती मागणी; २५ शोरूमचे लक्ष्य



पुणे (स. गांवकरी) : या भारतातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या संशोधन व विकास (R&D) आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने महाराष्ट्रातील विस्ताराला गती दिली आहे. कंपनीच्या नव्या Rorr Evoमोटरसायकलला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला असून, लाँचनंतर अवघ्या १५ दिवसांत २५ हजार बुकिंग झाल्या आहेत. यी पार्श्वभूमीवर कंपनीने आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत महाराष्ट्रात २५ शोरूम सुरू करण्याची योजना आखली आहे. यामुळे ग्राहकांना इलेक्ट्रिक मोटरसायकल, सेवा सुविधा मिळणार आहेत. कंपनीने पुण्यातील शिवाजीनगर शोरूममध्ये Rorr Evo चे महाराष्ट्रासाठी प्रादेशिक सादरीकरण केले. पुणे हे कंपनीसाठी देशातील सर्वाधिक प्रतिसाद देणाऱ्या बाजारपेठांपैकी एक असल्याचे कंपनीने नमूद केले. सध्या ओबेन इलेक्ट्रिकची महाराष्ट्रात ११ शोरूम्स कार्यरत असून, त्यापैकी पुण्यात वाकड, शिवाजीनगर, अरण्येश्वर आणि चिंचवड येथे चार शोरूम्स आहेत. याशिवाय छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, नागपूर, बार्शी, सोलापूर आणि अहमदपूर येथेही आउटलेट्स आहेत. कंपनी आर्थिक वर्ष २०२७ अखेरपर्यंत महाराष्ट्रात आणखी १४ नवीन शोरूम्स सुरू करणार आहे. उच्च कार्यक्षमतेच्या इलेक्ट्रिक मोटरसायकल्सची वाढती मागणी आणि वेगाने होणारा ईव्ही स्वीकार यामुळे हा विस्तार केला जात आहे. महाराष्ट्रातील एकूण Rorr Evo विक्रीपैकी जवळपास २५ टक्के विक्री पुण्यातून होईल, असा अंदाज कंपनीने व्यक्त केला आहे. नव्या Rorr Evo ला मिळालेला प्रतिसाद हा भारतातील इलेक्ट्रिक मोटरसायकल क्षेत्रातील सर्वात वेगवान सुरुवातीच्या बुकिंग्सपैकी एक मानला जात आहे. या मोटरसायकलची डिलिव्हरी जून २०२६ पासून सुरू होणार असून ग्राहकांना अद्याप ऑनलाइन पेमेंट पोर्टलद्वारे ₹९९,९९९ (एक्स-शोरूम) या प्रारंभिक किमतीचा लाभ घेता येणार आहे. कंपनीच्या विस्ताराबाबत बोलताना मधुमिता अगरवाल म्हणाल्या, "महाराष्ट्र प्रीमियम इलेक्ट्रिक मोटरसायकल्ससाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ म्हणून उदयास आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठाची मोठी झेप



नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने येथे इतिहास रचला आहे. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठाला विकसित महाराष्ट्र @२०४७ अंतर्गत उच्च शिक्षण क्षेत्रासाठी भारतातील पहिली एआय-ब्लॉकचेन आधारित ऑनलाइन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम विकसित करण्याचा ₹२९.९० लाखांचा प्रकल्प दिला आहे. ही प्रणाली राज्यातील सर्व ४२ सार्वजनिक विद्यापीठांच्या २८ मुख्य कार्यक्षमता निर्देशकांचा मागोवा एआय, रिअल-टाइम डॅशबोर्ड आणि ब्लॉकचेन-आधारित ऑडिट ट्रेलच्या माध्यमातून घेईल. विद्यापीठाचे कुलगुरू तथा प्रकल्पाचे मानद समन्वयक डॉ. मनोहर जी. चासकर यांनी प्रकल्प टीमचे अभिनंदन करताना सांगितले की हे यश विद्यापीठातील प्राध्यापकांच्या समर्पणाचे आणि तांत्रिक कौशल्याचे प्रतिबिंब आहे. यामुळे उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात एसआरटीएम विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, एसआरटीएम विद्यापीठाच्या क्षमतेवर विश्वास ठेवून हा ऐतिहासिक प्रकल्प मंजूर केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक व आयक्यूएसी संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी सांगितले की, ही नवीन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम सर्व ४२ विद्यापीठांमध्ये पारदर्शकता आणि अचूक डेटावर आधारित निर्णयक्षमता आणेल. त्यांनी अधोरेखित केले की त्यांच्या टीमचे इतर मोठे प्रकल्प – पीएम-उषा डॅशबोर्ड (राज्य प्रकल्प संचालनालय, रुसा, महाराष्ट्र शासन) आणि ओयूआयएमएस (उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद) – अंतिम टप्प्यात आहेत आणि लवकरच प्रक्षेपित होण्यास सज्ज आहेत. या सर्व यशांमुळे 'स्वारातीम' विद्यापीठाने उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात राष्ट्रीय नकाशावर आपले स्थान निर्माण केले आहे. हे २८ केपीआय राष्ट्रीय मानकांशी सुसंगत बनवण्यात आले आहेत. सह-अन्वेषिका व शालेय गणित विज्ञान संचालक डॉ. रुपाली एस. जैन यांनी स्पष्ट केले की, या निकषांमध्ये एनआयआरएफ, नॅक आणि युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे विद्यापीठांना राष्ट्रीय रँकिंगशी सुसंगत राहून आपल्या प्रगतीचे योग्य मूल्यांकन करता येईल. सह-अन्वेषक व नवोन्मेष, उद्योग जोडणी व लिंकेजेस संचालक डॉ. एस. जे. वाधेर यांनी नमूद केले की, विविध विद्यापीठांच्या आयक्यूएसी संचालकांच्या सूचनांचा यात समावेश करण्यात आला असून, यामुळे संस्थांना आपल्यातील उणिवा शोधून एकूण कार्यक्षमता सुधारता येईल. प्रणालीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. प्राथमिक आवृत्ती (Version 1.0) तीन महिन्यांत आणि एआय-आधारित अंतिम प्रणाली सहा महिन्यांत सादर केली जाईल. शासनाचा निधी केवळ सॉफ्टवेअर विकासासाठी आहे; सर्व हार्डवेअर व पायाभूत खर्च एसआरटीएम विद्यापीठ स्वतः उचलेल. प्र-कुलगुरू डॉ. आशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा प्रमुख प्रा. एम. के. पाटील तसेच इतर सर्व विधि अधिकारी, संचालक आणि प्राध्यापकांनी प्रकल्प टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे आणि पूर्ण प्रशासकीय मदतीचे आश्वासन दिले आहे. अनेक प्राध्यापकांनीही शुभेच्छा देत या प्रकल्पामुळे विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढेल आणि राज्याच्या विकासात योगदान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# अवैधरित्या डम्पिंग करणाऱ्या वाहनांवर पालिकेची कारवाई



ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कोलशेत परिसरात अवैधरित्या डेब्रीचे डम्पिंग करणाऱ्या वाहनांवर आज कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान संबंधित वाहन चालकांकडून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तब्बल 60 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. कोलशेत परिसरात काही वाहनांकडून अनधिकृतपणे डेब्री टाकण्यात येत असल्याची माहिती महानगरपालिकेला प्राप्त झाली होती. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने संबंधित ठिकाणी पाहणी करून कारवाई केली. अवैध डम्पिंगमुळे परिसराच्या स्वच्छतेवर तसेच पर्यावरणावर परिणाम होत असल्याने ही कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, अभियंता किशोर गुळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक साईराज कांबळे, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक चारु गोटे, स्वच्छता निरीक्षक सुमित जाधव यांनी केली. यावेळी जप्त करण्यात आलेले डेब्री पुढील प्रक्रिया करण्यासाठी अधिकृत प्रकल्पाकडे पाठवण्यात आले. तसेच शहरात अवैधरित्या डेब्री टाकणाऱ्यांविरोधात पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला.

# ग्रामीण महाराष्ट्रात इंडियन ऑइलकडून अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये हंगामी स्वरूपात इंधनाच्या मागणीत होत असलेल्या वाढीदरम्यान इंडियनऑइलकडून पेट्रोल (एमएस),डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा कायम ठेवण्यात येत आहे. अलिकडच्या काही दिवसांत महाराष्ट्रभर पेट्रोलियम उत्पादनांच्या उठावामध्ये इंडियनऑइलने लक्षणीय वाढ नोंदवली आहे. 1 ते 25 मे 2026 या कालावधीत पेट्रोल (एमएस) रिटेल विक्रीमध्ये वर्षानुवर्षे 22 टक्के वाढ नोंदवली गेली असून, त्याच कालावधीत डिझेल (एचएसडी) रिटेल विक्रीमध्ये 33 टक्क्यांची वाढ झाली आहे, जी वाढलेल्या हंगामी मागणीचे प्रतिबिंब आहे. सध्या डिझेलच्या मागणीत होत असलेली वाढ प्रामुख्याने महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या शेतीविषयक कामांमुळे आहे, जिथे शेतकरी आगामी पेरणी हंगामासाठी शेतांची तयारी करत आहेत. कृषी तसेच घरगुती गरजांसाठी अखंड इंधन उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी इंडियनऑइलकडून लॉजिस्टिक्स आणि पुरवठा व्यवस्थापनाचे काटेकोर समन्वय करण्यात येत आहे. नागपूर,जालना,बुलढाणा ,अकोला,वाशीम आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील शेतकरी आणि ग्राहकांनी इंडियनऑइलच्या रिटेल आऊटलेट्सवर डिझेलची सुरळीत उपलब्धता आणि अखंड सेवांबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत. जालन्यातील एका शेतकऱ्याने सांगितले, "शेतीच्या कामांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा काळ आहे आणि ट्रॅक्टर तसेच शेत तयारीसाठी आम्हाला नियमित डिझेलची आवश्यकता असते. इंडियनऑइल पंपांवर आम्हाला कोणत्याही अडचणीशिवाय इंधन मिळत आहे."

# दक्षिण काशी साधुसंत लघु कुंभमेळ्यात नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते उद्घाटन; हजारो भाविकांना संत दर्शनाचा लाभ!

वाई : (स. गांवकरी)



शक्ती शिवगंगा आश्रम, सनई मंदिर, श्री क्षेत्र मंधारवाडी (ता. वाई, जि. सातारा) तसेच तीर्थक्षेत्र लिम्बा गोवे येथे दक्षिण काशी साधुसंत लघु कुंभमेळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला उपस्थित होते.

यावेळी श्री स्वामी विश्वानंद सरस्वती महाराज, श्री बटुकगिरीजी गुरु महादेवगिरीजी बापू (सुरत, गुजरात), श्री राहुलेश्वरानंदजी महाराज, प.पू. अनंत घोष महाराज, प.पू. योगेंद्रजी गुरु बटुकगिरीजी महाराज, श्री किरण कावडे व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती.

भक्ती, शक्ती आणि अध्यात्माचा संगम असलेल्या या कुंभमेळ्यात भाविकांना साधुसंतांचे दर्शन, नामस्मरण आणि अमृतमयी प्रवचनांचा लाभ मिळाला. कुंभमेळ्याच्या उद्घाटनाचा मान मिळाल्याबद्दल नानजीभाई ठक्कर यांनी आनंद व्यक्त करत हे आपले सौभाग्य असल्याचे सांगितले.

दोन महिन्यांपूर्वी साधुसंतांनी एन.के.टी. कार्यालयात येऊन कुंभमेळ्याच्या उद्घाटनासाठी निमंत्रण दिल्याचेही त्यांनी सांगितले. या कुंभमेळ्यास देशभरातून तसेच विविध भागांतून साधुसंत आणि भाविक सहभागी झाले होते.

गुजरातमधून आलेल्या बटुक महाराज यांनी नानजीभाई ठक्कर यांच्या सामाजिक व धार्मिक कार्याचे कौतुक करत त्यांचा विशेष सन्मान केला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. विठ्ठल वरुडे पाटील, जयवंत बिल्डर्स, श्री वसंत बुचके, राजेंद्र पांडेजी, सौ. गायत्री लचके, योगेंद्र गगनगिरी महाराज यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थितांचे स्वागत केले. नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यात अयोध्या तसेच एन.के.टी.च्या माध्यमातून भाविकांसाठी निवासाची विनामूल्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. कार्यक्रमाची संपूर्ण व्यवस्था शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अध्यात्मिक वातावरणाचा लाभ घेतला.

# राजूर बस स्थानकात प्रवाशांना मिळेना पिण्याचे स्वच्छ पाणी

*कचऱ्याच्या विळख्यानंतर आता पाण्याचाही प्रश्न ऐरणीवर, मुजोर प्रशासनाविरुद्ध नागरिकांचा एल्गार!*

राजूर : (स. गांवकरी)



राजूर बस स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना साधे पिण्याचे स्वच्छ पाणी देखील देण्यास अकोले आगार आणि अहिल्यनगर एसटी प्रशासन अपयशी ठरले आहे. या संदर्भात लेखी अर्जाद्वारे स्वच्छ पाण्याची मागणी करून महिना उलटला, थेट जिल्हाधिकारी (DC) साहेबांची भेट घेतली, तरीही प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. कचऱ्याचे साम्राज्य आणि पिण्याच्या पाण्याचा अभाव यामुळे राजूर स्थानकाची दुरवस्था झाली असून, एसटी महामंडळाच्या मुजोर अधिकाऱ्यांविरुद्ध आता जनतेतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अर्जाला केराची टोपली; अधिकारी करतात अरेरावी!

राजूर हे परिसरातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील शेकडो गावांसाठी मुख्य केंद्र आहे. उन्हाळा संपत आला असून पावसाळा तोंडावर आहे, अशा स्थितीत प्रवाशांना पिण्याच्या स्वच्छ पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मात्र, अकोले आगार व्यवस्थापक श्री. धराडे, तसेच श्री. जगताप, सागर सांगळे, योगेश वाघमोडे, प्रशांत नेवगे या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या कायदेशीर अर्जाला केराची टोपली दाखवली आहे. जेव्हा तक्रारदारांनी फोन करून या मूलभूत सुविधेबाबत विचारणा केली, तेव्हा समस्या सोडवण्याऐवजी या कर्मचाऱ्यांनी तक्रारदारांशीच अरेरावी आणि उर्मट भाषा वापरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एकीकडे आगार पातळीवरील वरिष्ठ अधिकारी आपली जबाबदारी झटकून एसी केबिनमध्ये बसून आहेत, तर दुसरीकडे राजूर स्थानकाचे कंट्रोलर श्री. देशमुख साहेब यांना मात्र स्थानिक नागरिक, प्रवासी आणि विद्यार्थ्यांच्या रोषाला रोज सामोरे जावे लागत आहे. वरिष्ठांच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि सोयी-सुविधांअभावी कंट्रोलर देशमुख साहेबांवर कामाचा नाहक ताण पडत आहे. "प्रवासी देवो भव" अशी घोषणा देणारे एसटी महामंडळ प्रवाशांना साधे स्वच्छ पाणी देऊ शकत नाही, ही अत्यंत शरमेची बाब आहे. स्थानकात चहूबाजूला कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे आणि दुसरीकडे पिण्याच्या पाण्याची सोय नाही. पावसाळा सुरू झाल्यावर येथील कचरा सडणार असून, दूषित पाण्यामुळे डेंग्यू, गॅस्ट्रो आणि काविळीसारखे भयंकर आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करून आणि लेखी अर्ज देऊनही जर व्यवस्थापक धराडे आणि त्यांचे कर्मचारी एवढे मुजोर वागत असतील, तर यांच्यावर तात्काळ कडक शिस्तभंगाची व निलंबनाची कारवाई व्हावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. येत्या दोन दिवसांत पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय न झाल्यास आणि स्थानक कचरामुक्त न केल्यास आगार प्रशासनाविरुद्ध तीव्र ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा राजूरच्या ग्रामस्थांनी आणि प्रवाशांनी दिला आहे.

# भारती एअरटेलने डीओटी पॅनेलसमोर 'प्रायोरिटी पोस्टपेड' सेवेचे समर्थन केले

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

भारती एअरटेलने दूरसंचार विभागाच्या (डीओटी) पॅनेलसमोर आपल्या नव्या "प्रायोरिटी पोस्टपेड" सेवेचे समर्थन करताना सांगितले की, 5जी नेटवर्क स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित ही सेवा नेट न्यूट्रॅलिटीच्या नियमांचे उल्लंघन करत नाही तसेच प्रीपेड ग्राहकांच्या सेवेच्या गुणवत्तेत कोणतीही घसरण होत नाही. दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान समितीने मागवलेल्या स्पष्टीकरणाला उत्तर देताना एअरटेलने सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 5जीच्या मुख्य वैशिष्ट्यांचा वापर करून सेवा देण्यास परवानगी न दिल्यास देशातील 6जीच्या क्षमतेला धोका निर्माण होईल. "प्रायोरिटी पोस्टपेड ही सेवा कंटेंट-न्यूट्रल पद्धतीने कार्यान्वित करण्यात आली असून ती ट्राय आणि डीओटीच्या विद्यमान नियमावलीशी पूर्णपणे सुसंगत आहे. कोणत्याही ॲप्लिकेशनसाठी ब्लॉकिंग, थ्रॉटलिंग, कंटेंट-विशिष्ट प्राधान्य, झिरो-रेटिंग किंवा विशेष वागणूक दिली जात नाही," असे एअरटेलने म्हटले. एअरटेलने 19 मे रोजी "प्रायोरिटी पोस्टपेड" योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत गर्दीच्या बाजारपेठांमध्येही पोस्टपेड ग्राहकांना सातत्यपूर्ण इंटरनेट वेग मिळण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. "एअरटेल प्रायोरिटी फीचरमुळे प्रीपेड असो वा पोस्टपेड, कोणत्याही ग्राहकाच्या सेवेच्या गुणवत्तेत घट होत नाही," असे कंपनीने म्हटले. कंपनीने सांगितले की, सध्या व्यस्त वेळांमध्ये 5जी क्षमतेचा एकूण वापर सुमारे 38 टक्के आहे. यापैकी पोस्टपेड ट्रॅफिकचा वाटा केवळ सुमारे 4 टक्के असून, प्रायोरिटी पोस्टपेडसाठी व्हर्च्युअल "टनल" (स्लाइस) सुरू केल्यानंतर तो सुमारे 6 टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो, असे कंपनीने म्हटले.

# ऑनलाइन अभ्यासाच्या जोरावर दीपक नांदोडेची आयआयटी कानपूरमध्ये झेप

## आयआयटी जॅम २०२६ परीक्षेत देशात १६८ वा क्रमांक : अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित

मंठा : (स. गांवकरी)



जिद्द, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर विद्यार्थ्यांनी यशाची नवी शिखरे गाठल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यातच अहिल्यानगर येथे विज्ञान शाखेतील सांख्यिकी विषयाच्या तृतीय वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या दीपक मनोज नांदोडे याने ऑनलाइन अभ्यासाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय तंत्रज्ञान संस्था कानपूर येथे अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित केला आहे.

दीपक नांदोडे याने तृतीय वर्षात असतानाच आयआयटी जॅम २०२६ परीक्षेची तयारी सुरू केली होती. तयारीसाठी त्याने 'मॅथस्टॅट्स क्लास' या ऑनलाइन मार्गदर्शन संस्थेत प्रवेश घेतला. संस्थेकडून मिळालेले योग्य मार्गदर्शन, अभ्यासाचे नियोजन आणि मित्रांकडून मिळालेली प्रेरणा यामुळे त्याची तयारी अधिक सक्षम झाली.सुमारे सात ते आठ महिने सातत्यपूर्ण व मनापासून अभ्यास करून दीपकने आयआयटी जॅम २०२६ परीक्षेला सामोरे गेले. दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या या परीक्षेचा निकाल १९ मार्च २०२६ रोजी जाहीर झाला. या परीक्षेत त्याने अखिल भारतीय क्रमांक १६८ मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. यानंतर दिनांक २५ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या पहिल्या प्रवेश यादीत दीपकची भारतीय तंत्रज्ञान संस्था कानपूर येथे अर्थशास्त्र विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली. विशेष म्हणजे कोणत्याही प्रत्यक्ष वर्गांना उपस्थित न राहता केवळ ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करून त्याने हे यश मिळवले आहे.

दीपक हा 'दैनिक सकाळ'चे मंठा तालुका प्रतिनिधी कृष्णा भावसार यांचा नातू असून त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशाबद्दल बोलताना दीपकने आपल्या शिक्षकांचे, आई अनिता नांदोडे, वडील मनोज नांदोडे, मार्गदर्शक, ऑनलाइन मार्गदर्शन संस्था तसेच सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. "योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते," अशी भावना त्याने व्यक्त केली.

> "यश मिळवण्यासाठी महागडे क्लासेस किंवा मोठ्या शहरांची गरज नसते, तर गरज असते ती जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वतःवर असलेल्या विश्वासाची. मी केवळ ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करत आयआयटी जॅम २०२६ परीक्षेत अखिल भारतीय १६८ वा क्रमांक मिळवला. अनेक विद्यार्थी लाखो रुपये खर्च करूनही अपेक्षित यश मिळवू शकत नाहीत; मात्र योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही ध्येय| गाठता येते, हे मी सिद्ध करून दाखवले.माझ्या या प्रवासात आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक, ऑनलाइन मार्गदर्शन संस्था आणि मित्रांनी दिलेली साथ हीच माझी खरी ताकद ठरली."
>
> **- दीपक मनोज नांदोडे**

## थोडक्यात पण महत्वाचे



### डॉ. श्रीकांत पठारे यांच्या जिल्हा परिषद उमेदवारीवर शिक्कामोर्तब

पारनेर (स. गांवकरी) : तालुक्यातील जवळा–कान्हुर पठार जिल्हा परिषद गटासाठी महाविकास आघाडीच्या वतीने शिवसेना (उबाठा) पक्षाकडून शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याचे संकेत शिवसेना जिल्हाध्यक्ष राजेंद्र दळवी यांनी दिले. जनगणगना (एसआयआर)BLA नोंदणी प्रशिक्षण आणि 2 जून ला शिर्डी येथे होणाऱ्या शिवसेना शिबिर त्यानिमित्ताने जिल्हाप्रमुख यांनी घेतलेल्या बैठकीत या उमेदवारीबाबत सुतोवाच करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष दळवी म्हणाले की, पारनेरमध्ये महाविकास आघाडी झाली अथवा नाही, शिवसेना पक्षाच्या वतीने जवळा–कान्हुर पठार जिल्हा परिषद गटातून डॉ. श्रीकांत पठारे यांनाच उमेदवारी दिली जाणार आहे. त्यांच्या या घोषणेमुळे शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवसैनिकांच्या मेळाव्यात तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. पारनेर तालुक्यात महाविकास आघाडी अस्तित्वात असल्याने आघाडीच्या वतीने खासदार निलेश लंके हे तालुका व जिल्ह्याचे नेतृत्व करत आहेत. गत विधानसभा निवडणुकीदरम्यान महाविकास आघाडीच्या उमेदवार राणीताई लंके यांना निवडणुकीत डॉ. श्रीकांत पठारे यांनी अपेक्षित सहकार्य केले नसल्याचा आरोप निलेश लंके व त्यांच्या समर्थकांकडून करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर पारनेरमधील महाविकास आघाडीत अंतर्गत मतभेद असल्याची चर्चा सुरू होती. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी खासदार निलेश लंके यांनी जवळा–कान्हुर पठार गटातून मारुती रेपाळे यांना तयारीला लागण्याचे संकेत दिल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमधूनच डॉ. श्रीकांत पठारे यांच्याविरोधात उमेदवार उभा राहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

### शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यास सुरुवात

जामखेड तालुका (स. गांवकरी) : जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ (डी) अंतर्गत खर्डा चौक ते बीड कॉर्नर या भागातील अतिक्रमणे हटवून प्रलंबित रस्ता काम पूर्ण करण्यासाठी मंगळवार (दि. २६) सकाळी ९ वाजल्यापासून जामखेड नगरपरिषद व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या माध्यमातून संयुक्त मोहीम राबविण्यास सुरुवात करण्यात आली. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या कामाला अखेर गती मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असले, तरी अतिक्रमण हटविताना सर्वांना समान न्याय मिळावा, अशी मागणीही जोर धरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने वाहन चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वाहतुकीचा मोठ्या प्रमाणात खोळंबा होत होता. विशेषतः बीड कॉर्नर ते खर्डा चौक या भागातील अतिक्रमणांमुळे रस्ता रुंदीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून रखडले होते.या पार्श्वभूमीवर शहरातील प्रलंबित रस्ता काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने अनेक बैठका घेतल्या होत्या. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधान भवनात राष्ट्रीय महामार्गाचे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत ३१ मे पूर्वी राष्ट्रीय महामार्गाचे हद्दीतील सर्व अतिक्रमणे तातडीने हटवून रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते.त्यानुसार मंगळवारी जामखेड नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमी अभिलेख, महावितरण, पोलिस प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदाराचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली.

### पंडीत गजभारे यांना शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स च्या वतीने देण्यात येणारा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते पंडित गजभारे यांना नुकताच जाहीर झाला आहे दि २६ जून रोजी एका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा सिडको येथे पार पडणार आहे. सामाजिक कार्यकर्ते पंडित गजभारे यांनी विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या कार्याची दखल घेऊन निस्वार्थपणे केलेल्या कामाचे योगदाना म्हणून २०२६ चा छत्रपती राजर्षी शाहू महाराज भूषण पुरस्कार साठी त्यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र सुजाता पोहरे नांदेड डी एस वाघमारे अहमदपूर बा.रा. वाघमारे नांदेड यांच्या सहीने पत्र त्यांना देण्यात आले आहे. त्यांना मिळालेल्या राजश्री शाहू महाराज समाज भुषन पुरस्कार २०२६ मुळे गोपाळचावडी सिडको हडको परिसरासह जिल्ह्यातून अनेक त्यांच्या मित्र मंडळीनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### रविवारी परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषीत

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा नांदेड शहरात रविवार 31 मे 2026 रोजी सकाळी 10 ते सायं 5 वाजेपर्यंत 18 परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहेरील व्यक्तींचा उपद्रव होऊ नये तसेच परीक्षा स्वच्छ सुसंगत वातावरणात पार पाडण्याच्याहष्टिने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम 163 नुसार 31 मे रोजी परीक्षा केंद्र परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे. या आदेशानुसार परीक्षा केंद्रापासून 500 मीटरच्या परिसरात रविवार 31 मे 2026 रोजी सकाळी 8 ते रात्री 7 वाजेपर्यंत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश करता येणार नाही. परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या 500 मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास, जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील 500 मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेशाद्वारे प्रतिबंध केले आहे.

# गोवंश हत्या बंदी कायद्याच्या कडक अंमलबजावणीची मागणी

## विविध संघटनांचे पोलीस निरीक्षकांना निवेदन




किनवट : (स. गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने राज्यातील गोवंश हत्या बंदी कायद्याच्या कडक अंमलबजावणीसाठी नुकतेच जारी केलेल्या नवीन शासन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करावी, तसेच गोवंशाची अवैध वाहतूक व कत्तल करणाऱ्यांविरुद्ध कठोर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी विविध हिंदुत्ववादी व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन किनवटचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने दिनांक २१ मे २०२६ रोजी शासन परिपत्रक क्रमांक एमआयएस-०५२६/प्र.क्र. ५६/ विशा-१ब जारी करून राज्यातील गोवंश संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व पोलीस प्रशासनाला दिले आहेत. शासनाने स्वदेशी गायीला 'राज्यमाता'चा दर्जा दिल्यानंतर गोवंश हत्या व अवैध वाहतुकीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मात्र, काही तस्कर आणि समाजकंटक छुप्या मार्गाने गोवंशाची अवैध वाहतूक व कत्तल करत असल्याचे प्रकार अजूनही समोर येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अशा बेकायदेशीर कृत्यांमुळे प्राणी कल्याण कायद्यांचे उल्लंघन होत असून धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गृह विभागाच्या नव्या शासनादेशानुसार पोलीस प्रशासनाने अधिक सतर्क राहून गोवंश संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांना नवीन शासन परिपत्रकानुसार तातडीने व कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती पोलीस निरीक्षकांना करण्यात आली आहे. "गोवंश रक्षण हाच आमचा संकल्प" असा उल्लेख करत या निवेदनावर विहिंपचे जिल्हा मंत्री संतोष रायेवार, कोषाध्यक्ष शिवराज चाडावार, शहर मंत्री जयंत मच्छर्लावार, भाजप शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत पाटील क-हाळे, सरचिटणीस बाळकृष्ण कदम, रोहित चाडावार, आदित्य कलकुंटावार, क्षितिज रापणवार, अमरनाथ हुसे, अजय जाटवे, साहिल जाधव, शिवराज गुंजकर, राघव बोकारे, शैलेश वासुदेव, रितीकेश डोनेराव, अविनाश सल्लेवाड, किरण रेनीवार, साईराम भवरे, समर्थ कदम, राहुल खंडे, विश्वजीत मिसलवार, दर्शन बरबडकर, आशिष पवार, योगेश गोपनवाड, संस्कार गायकवाड, रोहित भगत, जयराज वर्मा, नरसिंग तक्कलवार, सतीश बिराजदार, कृष्णा कलकूठलावार, प्रा. विश्वास कोल्हारीकर व्यंकट भातनासे, सुनिल मच्छेवार, गोपाल कटकमवार, बालाजी बच्चेवार, अनिश राजुरकर, अक्षय राजुरकर, अजय सुर्यवंशी, रविकांत सटलावार, कृष्णा कदम, संजय सोनी आदींसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आशाताई जाधव (शिंदे) यांना भावपूर्ण श्रद्धांजली

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वरिष्ठ लिपीक स्व. श्रीमती आशाताई विजय जाधव (शिंदे) यांच्या दुःखद निधनाबद्दल विद्यापीठाच्या वतीने आयोजित श्रद्धांजली सभा मंगळवार, दि. २६ मे २०२६ रोजी मुख्य प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात भावपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

स्व. आशाताई जाधव (शिंदे) यांनी आपल्या सेवाकाळात कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा व समर्पित भावनेने कार्य करत विद्यापीठ प्रशासनात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या अकाली निधनामुळे विद्यापीठ परिवाराने एक मनमिळावू, कर्तव्यदक्ष व सहृदय सहकारी गमावल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, जैवतंत्रशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. बी.एस. सुरवसे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. स्व. आशाताई जाधव (शिंदे) यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करून ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व शोकाकुल परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, अशी प्रार्थना करण्यात आली. श्रद्धांजली सभेचा समारोप दोन मिनिटे मौन पाळून करण्यात आला.

## जिल्ह्यातील शालेय पोषण आहारात 'पोषण' कमी ? भ्रष्टाचाराची हमी

वाशिम : (स. गांवकरी)




वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा संशय अधिक गडद होत असून, आता समोर आलेल्या पोहोच पावत्यांनी संपूर्ण प्रशासन हादरवून सोडले आहे. विद्यार्थ्यांना पोषण देण्यासाठी शासनाकडून पाठविण्यात आलेल्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर अपहार झाल्याचे धक्कादायक चित्र या कागदपत्रांतून स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे, एकाच शाळेसाठी, एकाच कालावधीतील आणि जवळपास एकाच स्वरूपाच्या पावत्यांमध्ये धान्याच्या वजनात प्रचंड फरक दिसून येत असल्याने हा प्रकार केवळ लेखनिक चूक नसून संगनमताने रचलेला "शालेय पोषण आहार घोटाळा" असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. " जगदंबा एंटरप्रायझेस बीड " यांच्या नावाने तयार करण्यात आलेल्या पावत्यांमध्ये शासकीय तांदूळ वाहतुकीचे वेगवेगळे आकडे नमूद करण्यात आले आहेत. उपलब्ध पाच पावत्यांमधूनच तब्बल १००० किलोपेक्षा अधिक तांदळातील तफावत समोर आली आहे. ही धान्याची ही धान्याची तफावत नेमकी कुठे गेली? विद्यार्थ्यांच्या ताटातील घास कोणाच्या गोदामात पोहोचला? असा संतप्त सवाल आता वाशिम जिल्ह्यातील नागरिकांच्या मुखातून सूर धरू लागले आहेत. विशेष बाब म्हणजे सर्व पावत्यांवर संबंधित मुख्याध्यापकांचे माघारी खोट्या शिक्के व स्वाक्षऱ्या आहेत. त्यामुळे या प्रकारात शाळांचे मुख्यध्यापक वगळता केवळ पुरवठादारच नव्हे तर काही अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. एकाच कालावधीतील दोन वेगवेगळ्या पावत्यांमध्ये एवढा मोठा फरक कसा? जर एक पावती खरी असेल तर दुसरी खोटी कोणाच्या सांगण्यावरून तयार करण्यात आली? आणि जर दोन्ही अधिकृत असतील तर शासनाची फसवणूक कोणी केली? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. तक्रारदारांनी हा केवळ सुरुवातीचा पुरावा असल्याचे सांगितले असून, अशाच प्रकारच्या शेकडो पावत्या, नोंदी आणि पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा केला आहे. जर या सर्व कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी झाली तर वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेतील मोठा भ्रष्टाचार उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

तूरडाळ – ७० किलो, हरभरा – ७५ किलो, मूगडाळ – १५० किलो, वाटाणा – १३५ किलो तर दुसऱ्या पावतीत : तूरडाळ – ५० किलो, हरभरा – ५५ किलो मूगडाळ – १०० किलो वाटाणा – ८५ किलो म्हणजेच : तूरडाळ २० किलो कमी, हरभरा २० किलो कमी, मूगडाळ ५० किलो कमी वाटाणा ५० किलो कमी इतकेच नव्हे तर मसाले, जिरे, मोहरी, हळद पावडर यामध्येही फरक असल्याचे दिसून येत आहे.

## पुण्यतिथीनिमित्त ५१ हजार रूपयांचे बक्षिसे



नायगाव : (स. गांवकरी)

नायगाव तालुक्यातील टाकळी येथील वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त बरबडा येथे खुले क्रिकेटचे सामने ठेवण्यात आले होते एकुण सामने ३० होते यात चार सेमी फायनला आले १ बक्षिस. बरबडा राजमुद्रा क्रिकेट ने मारले बाजी २ बक्षिस पाळा संघ ने मारले ३ बक्षिस माळकौठा ने मारले ४ बक्षिस मनुर संघाने कमिटिचे आयोजन शंकर मदेवाड तात्या याने केले होते सोमनाथ पचलिंग , स्वामी आलेवार , दिनेश सूर्यवंशी , राजू वटपलवाड , राजू व्यंकपुरवार , रंजीत हनमंते , विकास हनमंते. दिलीप शिंगेवाड , वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त कै . रावसाहेब पाटील मोरे यांच्या पुण्यातीधि निमित्ताने खुले सामने ठेवण्यात आले होते वडिलांच्या पुण्यतिथि निमित्त मनोज पाटील मोरे यांचे नायगाव तालुक्यातील असलेल्या टाकळी येथील रावसाहेब पाटील मोरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त बरबडा येथे खुले क्रिकेटचे सामने ठेवण्यात आले होते रावसाहेब पाटील मोरे यांच्या पुण्य स्मरण दिनाचे औचित्य साधून. समाजासाठी काहीतरी देणे लागतो या भावनेतून ५१ हाजार. रुपये खर्च करून क्रिकेटचे सामने ठेवण्यात आले होते आजच्या धकाधकीच्या जिवनात शारिरिक व्यायाम आरोग्याची काळजी घेण्यासाठी क्रिकेटचे निश्चितच कोतुकास्पद असुन मनोज पाटील मोरे यांनी समाजाच्या प्रति असलेली बांधिलकी जोपासत आहेत नायगाव मतदार संघातील नांदेड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष कै. रावसाहेब पाटील मोरे टाकळीकर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्ताने चहात्यांच्या वतीने रावसाहेब पाटील मोरे टाकळीकर यांच्या प्रती असलेल्या निष्ठा होती विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते यावेळी सामन्याची सांगता करण्यात आली यावेळी मनोज पाटील मोरे ,

नायगाव तालुका अध्यक्ष बालाजी मदेवाड , गंगाधर बंडुरे यांचें प्रतिनिधी बापूराव बडुरे , दिलीप धर्माधिकारी यांचें प्रतिनिधी सिद्धेश्वर भोसकर , माधव धर्माधिकारी. ,.मतदासंघांतील लोकप्रतिनिधी. विविध क्षेत्रातील मान्यवर . विविध पक्षाचे पदाधिकारी. कार्यकर्ते . सरपंच चेअरमन यांच्या सह राजकीय शासकिय मित्रपरिवार . शेतकरी . कामगार.यांच्यासह गांवकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## पुनखेडा साई देवघरात तुळसी वृंदावनची स्थापना




रावेर : (स. गांवकरी)

रावेर तालुक्यातील पुनखेडा येथील साई देवघरात तुळसी वृंदावनची प्राण प्रतिस्थापना मोठ्या भक्ती भावाने भक्त गणांच्या उपस्थितीत करण्यात आली . रावेर जवळच असलेल्या पुनखेडा येथिल तसेच तालुक्यातील भाविकांचे श्रध्दा स्थान असलेल्या या मंदीरात तालुका भरातून हजारो भाविक येथे दर्शसाठी येत असतात . नवसाला पावणारे देवघर म्हणूनही या देव घराची महती आजही आहे . स.1980 पासून असलेले साई देवघर येथे अधिक मास जेष्ठ शु.९ (नवमी) दिनांक 24/05/2026 रविवार रोजी शुभ मुहुर्त असल्याने , सकाळी 08:00 वाजता नवीन तुळशी वृंदावन स्थापना करून त्यामध्ये पवित्र तुलसी रोपण करण्यात आले. वेद पारंगत ब्राह्मण वृंद यांच्या हस्ते विधीवत पूजा संपन्न झाली. या देवघरातील वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणतीही दक्षिणा पेटी नाही. पंचक्रोशीतील भाविकांची या देवघरात दर्शनासाठी नेहमीच वर्दळ असते.

# चांदवडमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा एल्गार

- मुंबई-आग्रा महामार्ग ठप्प, महाविकास आघाडीचे दिग्गज नेते रस्त्यावर
- "कांद्याला हमीभाव द्या, शेतकऱ्यांची कोंडी थांबवा"
- कळवण काँग्रेस अध्यक्ष के.के. गांगुर्डे यांचा सरकारवर हल्लाबोल



कनाशी : (स. गांवकरी)

कांद्याला रास्त हमीभाव मिळावा व निर्यातबंदी तातडीने उठवावी या प्रमुख मागणीसाठी आज नाशिकच्या चांदवड येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा विराट महामोर्चा धडकला. महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या 'क्रांती महामोर्चा'त हजारो शेतकरी रस्त्यावर उतरले. चांदवड चौफुली येथे मुंबई-आग्रा महामार्गावर चक्का जाम आंदोलन करत सरकारला धारेवर धरले. महामोर्चाला संबोधित करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार, शिवसेना ठाकरे गटाचे विधानपरिषद सदस्य आंबादास दानवे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "सरकारने निर्यातबंदी लावून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. खर्च निघत नाही, कर्जाचा डोंगर वाढतोय. शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि सरकार मात्र झोपेचे सोंग घेऊन आहे. कांद्याला किमान ३०००रु. प्रति क्विंटल हमीभाव जाहीर करा, निर्यातबंदी तात्काळ उठवा," अशी मागणी आ. रोहित पवार यांनी केली.

या महामोर्चासाठी कळवण तालुक्यातून काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते व शेतकरी चांदवडमध्ये दाखल झाले होते. काँग्रेस तालुका अध्यक्ष के.के. गांगुर्डे, काँग्रेस सेल जिल्हाध्यक्ष राम चौरे सरचिटणीस योगेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी महामार्गावर ठिय्या मांडून सरकारचा जाहीर निषेध नोंदवला. "शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही आणि सरकारला घाम नाही. कांदा पिकवणारा जगाचा पोशिंदा आज रस्त्यावर भीक मागायची वेळ आली आहे. निर्यातबंदीचा शेतकऱ्यांच्या मुळावर आलेला घाला सरकारने तातडीने थांबवावा. कांद्याला हमीभाव मिळालाच पाहिजे. शेतकऱ्यांची ही कोंडी थांबली पाहिजे. आमच्या मागण्या मान्य करा, नाहीतर मंत्रालयाला घेराव घालू," अशा कडक शब्दात के.के. गांगुर्डे यांनी सरकारला धारेवर धरले. दुपारी 12 ते 2 या वेळेत चांदवड चौफुली येथे मुंबई-आग्रा महामार्गावर शेतकऱ्यांनी चक्का जाम आंदोलन केले. त्यामुळे दोन्ही बाजूला वाहनांच्या 5 ते 6 किमी लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी वाहतूक वळवण्यासाठी मोठी कसरत केली. "आजचा हा महामोर्चा म्हणजे ट्रेलर आहे. सरकारने 8 दिवसांत निर्णय घेतला नाही, तर नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात रस्ता रोको करू. मंत्रालयाच्या दारात कांदे फेकून आंदोलन करू," असा इशारा आंबादास दानवे यांनी दिला. दरम्यान, कांद्याचा प्रश्न ऐरणीवर आल्याने नाशिक जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे. सरकार या आंदोलनाची दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# प्रशिक्षण शिबिरातील विचार बूथ स्तरापर्यत कार्यकर्त्यांनी पोहचवा : ना. विखे

- भाजपा कार्यकर्त्यासाठी अंत्योदयाचा मंत्र हा आत्मा तर प्रशिक्षण पुस्तिका ही गीता - ना. विखे
- शिर्डी येथे भाजपा कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग संपन्न





शिर्डी : (स. गांवकरी)

भाजपा कार्यकर्त्यासाठी अंत्योदयाचा मंत्र हा आत्मा तर प्रशिक्षण पुस्तिका ही गीता असून प्रशिक्षण शिबिरातील विचार बूथ स्तरापर्यत व शेवटच्या कार्यकर्त्यां पर्यंत पोहचवले तर प्रशिक्षणचा उद्देश सफल होईल अशी भावना जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली. शिर्डी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान 2026 च्या समारोप प्रसंगी ना. विखे पाटील बोलत होते. यावेळी आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी आ. सौ. स्नेहलता कोल्हे, प्रदेश कार्यालयीन प्रभारी रवीजी अनासपुरे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अनिल मोहिते व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रशिक्षण शिबिरातील दोन दिवसांच्या कार्यक्रमात एकूण अकरा सत्रे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये आमदार विक्रम पाचपुते यांनी एकात्मता मानवतावाद, महिला प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांनी व्यावहारिक, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी स्थानिक कार्यक्रम व बूथ प्रबंधन व मन की बात, माजी आमदार सुनील राणे यांनी कार्यकर्ता विकास, माजी आमदार राम सातपुते, प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी भाजपा कार्यविस्तार, प्रदेश प्रवक्ते अजित चव्हाण यांनी सोशल मिडिया व आय टी सेल, लक्ष्मण सावजी यांनी भाजपा चा इतिहास व विकास, प्रदेश सचिव भैरवी वाघ यांनी विचार परिवार, विजय चौधरी यांनी भाजपा कार्यपद्धती तर लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रेरणा होनराव यांनी गरीब कल्याण योजना व नारी शक्ती वंदना या विषयावर मार्गदर्शन केले.

ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, या प्रशिक्षण शिबिराला वैचारिक अधिष्ठान होते. पक्षाचा विचार घेऊनच समाजातील सर्व क्षेत्रांत कार्यकर्ता म्हणून काम करताना पक्ष संघटना हेच आपल्या सर्वासाठी बळ आहे. देशाच्या विकास प्रक्रियेलाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंत्योदयाच्या मंत्राची जोड दिली.

प्रशिक्षण शिबिरामुळे आपल्या कार्याला गती मिळणार असून, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा अंत्योदयाचा आणि एकात्म मानवतेचा मंत्र आपल्या सर्वासाठी आत्मा आहे. समाजाच्या शेवटच्या घटकाला विकास प्रक्रियेत सामावून घ्यायचे आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाचा विकास होईल तेव्हाच देशाचा विकास होईल, हे उद्दिष्ट समोर ठेवून प्रत्येकाची वाटचाल असली पाहिजे.राजकीय व सामाजिक कार्यात आपली वैचारिक भूमिका स्पष्ट असली पाहिजे. 'राष्ट्र प्रथम' ही भावना आपल्या कृतीत असावी. पक्षाचे संस्कार हाच आपल्या कामाचा पाया असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या सुरू असलेल्या प्रत्येक कामाला विचारांची जोड आहे. म्हणूनच जगात देशाचे स्थान बळकट झाले असल्याकडे विखे पाटील यांनी लक्ष वेधले.भारतीय जनता पक्षाचा एक प्रशिक्षित कार्यकर्ता म्हणून समाजातील सर्व क्षेत्रांत आपल्याला काम करायचे आहे. लोकांना पक्षाशी जोडायचे आहे. भाजप हा एक परिवार आहे ही भूमिका घेऊन कार्यकर्त्यांना आपली कर्तव्ये बजावावी लागतील.

चांगला संवाद, चांगले वर्तन आणि संघटना हे आपले बळ मानून पुढे जाण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

या प्रशिक्षण वर्गाचे स्वागत व प्रास्तविक जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी सूत्रसंचालन सोशल मिडिया जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे यांनी व वर्ग प्रशिक्षण गीत सचिन भैरव व राजेश्वर श्रीराम यांनी सादर केले.

वर्ग यशस्वी करण्यासाठी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर नगर जिल्हा अध्यक्ष नितीन दिनकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे, कांचनताई मांढरे, अशोक पवार, उपाध्यक्ष किरण बोरुडे, शिर्डी मंडल अध्यक्ष रविंद्र गोंदकर, योगेश गोंदकर यांनी विशेष प्रयत्न केले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ड्रीमे टेक्नॉलॉजीसोबत ख्रिस्तियानो रोनाल्डोची नवी जागतिक भागीदारी

नवी दिल्ली (स. गांवकरी) : नाविन्यपूर्ण गृहउपकरणे आणि उत्कृष्ट घरगुती उपाय क्षेत्रातील जागतिक अग्रणी असलेल्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने, आज फुटबॉल क्षेत्रातील दिग्गज खळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डोसोबत एका ऐतिहासिक जागतिक भागीदारीची घोषणा केली. हे सहकार्य कंपनीच्या वाटचालीतील एक निर्णायक टप्पा ठरले असून, ज्यामध्ये जगातील सर्वात शिस्तबद्ध खेळाडूंपैकी एकाला तंत्रज्ञानातील परिपूर्णतेचा आणि गुणवत्तेतील सर्वोच्चतेचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या ब्रँडशी एकत्र आणले जाते. ही नियुक्ती, ड्रीमे च्या जागतिक ब्रँड उपस्थितीच्या धोरणात्मक उंचावण्याचे प्रतीक असून, ती कंपनीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सध्याच्या परिपक्वतेचे प्रतिबिंब आहे. जलद विस्तार आणि उच्च-गती मोटर तंत्रज्ञान व एआय-आधारित प्रणालींमधील सातत्यपूर्ण प्रगतीची अनेक वर्षे लोटल्यानंतर, ड्रीमे ने जागतिक स्तरावर एक आदर्श म्हणून आपले स्थान भक्कम केले आहे; आणि आता या प्रतिष्ठित भागीदारीमुळे त्यांचे हे स्थान अधिकच दृढ झाले आहे. ड्रीमे च्या विकासाचा हा एक स्वाभाविक परिपाक असून, उच्च-दर्जाच्या गृहउपयोगी उपकरणांच्या बाजारपेठेत खऱ्या अर्थाने जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यास आपण सज्ज आहोत, याचाच हा एक संकेत आहे.

### शॉप्सीची नवी झेप; कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित खरेदी मंच तयार

नवी दिल्ली (स. गांवकरी) : भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या हायपरव्हॅल्यू ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्समध्ये गणल्या जाणाऱ्या शॉप्सी बाय फ्लिपकार्टने आज नवीन एआय-पॉवर्ड शॉप्सी ॲप सुरू करत असल्याची घोषणा केली. शॉप्सी प्लॅटफॉर्मचे रूपांतर आता ऑफर्सवर आधारित खरेदीच्या स्थळातून एका आकर्षक, बक्षिसे मिळवून देणाऱ्या गेमिफाइड अनुभवात करण्यात आले आहे. देशातील महानगरे व श्रेणी-२ शहरांत राहणाऱ्या व भारतातील ऑनलाइन खरेदीला नवीन आकार देणाऱ्या तरुण, महत्त्वाकांक्षी, मूल्याबाबत जागरूक अशा भविष्यकाळातील १०० दशलक्ष ग्राहकांना डोळ्यापुढे ठेवून प्लॅटफॉर्मला हे नवीन स्वरूप देण्यात आले आहे. तीन रचनात्मक बाबींमुळे भारतातील ई-कॉमर्स क्षेत्राचे स्वरूप बदलत चालले आहे: पहिला बदल म्हणझे नवीन ग्राहकांच्या वाढीमध्ये श्रेणी २+ शहरांचा वाटा ६५ टक्के* आहे; दुसरा बदल म्हणजे जेन झेड या समूहाच्या हवे ते शोधण्याच्या सवयी मुलभूतरित्या वेगळ्या आहेत आणि भारतातील ऑनलाइन ग्राहकांमध्ये या समूहाचा वाटा सुमारे निम्मा आहे; आणि तिसरा मुद्दा म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्म्समध्ये विश्वासाचा अभाव अजूनही आहेच. शॉप्सीच्या नवीन ॲपकडे या तिन्ही बाबींवर तोडगा आहे: सामाजिक शोध, व्हिडिओ-लेड उत्पादन अनुभव, पर्सनलायझेशन आणि गेमीफाइड बक्षिसे हे सर्व एकत्र आणून हायपर-कनेक्टेड जेन झेड व पुढील १०० दशलक्ष भारतीय ग्राहकांसाठी अखंडित व अंत:प्रेरणाधारित प्रवास सुरू करणारा प्लॅटफॉर्म शॉप्सीने विकसित केला आहे. ग्राहक जेथे असतील तेथे हा प्लॅटफॉर्म त्यांच्यासाठी उपलब्ध आहे आणि व्यवहारापूर्वीच त्यांचा विश्वास जिंकण्याचे काम करत आहे.

### आधुनिक व संस्कारयुक्त हॉस्टेलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू



पुणे (स. गांवकरी) : शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या जैन समाजातील विद्यार्थ्यांना सुरक्षित, संस्कारित आणि आधुनिक निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमृता सुनील गांधी आणि स्मृती श्रुतेश गांधी यांनी एक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत मागील वर्षी कोथरूड येथे सुमारे ७० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले अत्याधुनिक जैन बॉईज हॉस्टेल सुरू करण्यात आले असून त्यास विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे. आगामी शैक्षणिक वर्षासाठी या हॉस्टेलची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून महाराष्ट्र, राजस्थान, गुजरातसह देशभरातील जैन विद्यार्थ्यांना इथे प्रवेश घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना घरासारखे वातावरण, शिस्तबद्ध जीवनशैली, गुणवत्तापूर्ण भोजन व्यवस्था आणि अभ्यासासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थापकांनी भर दिला आहे. हॉस्टेलमध्ये एसी रूम्स, वाय-फाय, जिम, इंडोअर गेम्स यांसारख्या सुविधा उपलब्ध असून जैन संस्कारांनी समृद्ध सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून शांत आणि प्रेरणादायी परिसराची उभारणी करण्यात आली आहे.

## नांदेड जिल्ह्यात खरीपसाठी मुबलक खत साठा उपलब्ध

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- शेतकऱ्यांनी अफवांना बळी न पडता खत तुटवड्याच्या भीतीपोटी अनावश्यक खत खरेदी करू नये

शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठाच्या शिफारसीत खतमात्रानुसार, जमीन आरोग्य पत्रिका अहवालानुसार तसेच पीक वाढीच्या टप्प्यानुसार खत खरेदी करावे. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये व खत तुटवड्याच्या भीतीपोटी अनावश्यक खत खरेदी करू नये. खते उपलब्ध होण्यास अडथळा निर्माण झाल्यास, वाजवीपेक्षा जास्त दरात खत विक्री होत असल्यास, खतामध्ये कोणत्याही प्रकारची लिंकिंग होत असल्यास अथवा बोगस खतांची विक्री होत असल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने खत ही सर्वात महत्त्वाची निविष्ठा असते. राज्य पातळीवर खताचे नियोजन कृषी आयुक्तालय पुणे येथून होत असते. कृषी आयुक्तालयाकडून खरीप हंगामाच्या सुरवातीलाच जिल्ह्यासाठीचे खताचे आवंटन कळवले जाते. नांदेड जिल्ह्याला खरीप हंगामासाठी दरवर्षी सरासरी 2 लाख मेट्रिक टन खतांची आवश्यकता असते. खरीप हंगाम 2026 साठी नांदेड जिल्ह्याला सुमारे 2 लाख 11 हजार 500 मे.टन इतके खत आवंटन प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने 60 हजार 200 मे. टन युरिया, 32 हजार 300 मे. टन डीएपी व 85 हजार 300 मे. टन संयुक्त खते यांचा समावेश आहे. मागील वर्षीची शिल्लक व यावर्षी 1 एप्रिल पासून आज तागायत झालेला पुरवठा याचा अभ्यास केल्यास बाजारात 31 हजार 098 मे. टन युरिया होता.

## अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथेचे आयोजन

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



श्री साई संस्थान व गौशाळा कौठा नांदेड येथे श्री साई बाबा यांच्या मुर्ती स्थापनेला 36वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन25 मे ते 1जुन 26 दरम्यान करण्यात आले असुन आज प्रथम दिवशी 25 मे रोजी ह.भ.प.प्रविण महाराज पार्डीकर यांच्या श्रीमद् भागवत कथेला दुपारी सुरुवात झाली व रात्रीला ह.भ.प.निखील महाराज चक्रवार यांच्या कीर्तनाने आज प्रथम दिवशी सेवा झाली आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला असून दैनंदिन काकडा आरती, साईबाबा अभिषेक,साई चरित्र पारायण,गाथा भजन,श्रीमद भागवत कथा रूपाली हरिपाठ व रात्री किर्तन आयोजित करण्यात आले आहेत. या सप्ताहात श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ मध्ये भागवत कथाकार हभप प्रविण महाराज पार्डीकर यांच्या सुमधुर वाणीतुन संगितमय कथा दुपारी1ते 4 आयोजित करण्यात आली आहे. तर सप्ताह मध्ये हभप निखिल महाराज आळंदीकर,हभप पंढरीनाथ महाराज मुरकुटे, हभप विश्वनाथ महाराज हिंबटकर,हभप महेश महाराज शेवाळकर,हभप बालाजी महाराज गुडेवार,हभप राम महाराज पांगेरकर ,हभप राम महाराज ठाकूर बुवा पंढरपुरकर यांच्ये दैनंदिन किर्तन व भजनी मंडळ संत संत भगवान बाबा अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था हरिपाठ व किर्तन साथ सप्ताह मार्गदर्शक श्रीराम महाराज पांगेरकर हे आहेत. शूक्रवार 29 मे रोजी श्रीकृष्ण प्राणप्रतिष्ठा दिवस वर्ष 10वे आहे . 1जुन रोजी अखंड हरिनाम सप्ताह सांगता हभप राम महाराज ठाकूर पंढरपूर यांच्या काल्याचा

किर्तनाने व महाप्रसादाने सांगता होणार आहे. सप्ताह यशस्वीतेसाठी साई संस्थान व गौशाळा पदाधिकारी व विश्वस्त परिश्रम घेत आहेत.

पहिल्या दिवशी हभप प्रविण महाराज व हभप निखिल महाराज यांच्या धार्मिक समिती प्रमुख श्री गणेश श्रीरामराव गादेवार यांनी महाराजांचा श्री पांडुरंगाची प्रतिमा देऊन सन्मानित केले, याप्रसंगी मंदीराचे कोषाध्यक्ष, टाळकरी व भक्तगण उपस्थित होते. या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथेचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, उपाध्यक्ष प्रल्हाद गव्हाणे,सचिव श्रीराज चक्रवार व पदाधिकारी यांनी केले आहे.

## चालुक्य वंशजांनी एकाच छत्राखाली यावे - दिपक साळुंखे

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या चालुक्य वंशजांनी एकत्र येऊन संघटित झाले पाहिजे, असे प्रतिपादन चालुक्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा चालुक्य घराण्याचे वंशज दिपक (आबा) साळुंखे यांनी केले. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नाव्ही, भोगंवली, भांबरडे व पांडे येथे आयोजित राज्यस्तरीय सोनवणे परिवार स्नेह मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी साळुंखे यांनी स्वराज्यातील सोनवणे घराण्याच्या योगदानाविषयी माहिती दिली.

कार्यक्रमात प्रा. दिनेश सोनवणे यांनी सांगितले की, सोनवणे परिवार हा चालुक्य वंशीय असून चालुक्य साम्राज्यात उपराजधानी म्हणून ओळख असलेल्या नाव्ही-भोगंवली परिसराशी या घराण्याचा इतिहास जोडलेला आहे. सोनवणे परिवाराचे मूळ पुरुष बाबाजी सोनवणे होते. कर्नाटकातून आलेल्या या घराण्याकडे काही गावांची पाटीलकीही होती. प्रतापगड परिसरातील सोनवणे घराण्याला 'पानसरे' हा किताब मिळाला होता. तसेच जावळीचा काही भागही सोनवणे घराण्याच्या अखत्यारीत होता, अशी माहिती त्यांनी दिली.

प्रा. विलास सोनवणे यांनी उपस्थितांना आवाहन करताना सांगितले की, सोनवणे परिवारातील प्रत्येकाने आपल्या घराण्याविषयी माहिती दिल्यास सोनवणे परिवाराचा सविस्तर इतिहास लिहिणे शक्य होईल.

सन २०२७ मध्ये शिरूर तालुक्यातील निर्वी येथे पुढील भव्य सोनवणे परिवार मेळावा आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. यासाठीचा नारळ निर्वीचे सरपंच तात्यासाहेब सोनवणे यांच्याडे सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमाला जयसिंग सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. राम सोनवणे, संजय सोनवणे, शांतीलाल सोनवणे, मच्छिंद्र महाराज सोनवणे, निलेश सोनवणे, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब सोनवणे, माजी संचालक कैलास सोनवणे, तात्यासाहेब सोनवणे, नामदेव सोनवणे, उल्हास सोनवणे, संतोष सोनवणे, विनोद सोनवणे, आप्पासाहेब सोनवणे, तुकाराम सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्हा आरोग्य विभागाकडून गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाला गती

ठाणे : (स. गांवकरी)

- ठाणे जिल्ह्यातील ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४ उपकेंद्रांना राष्ट्रीय स्तरावरील NQAS मानांकन

जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित, पारदर्शक व रुग्णकेंद्री आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागामार्फत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या National Quality Assurance Standards (NQAS) अंतर्गत जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांच्या सेवा गुणवत्ता वृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून, त्याला सकारात्मक यश मिळत आहे.ठाणे जिल्ह्यातील ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांनी राष्ट्रीय स्तरावरील NQAS गुणवत्ता मानांकन प्राप्त केले आहे. यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र वज्रेश्वरी, खरबाव, धसई आणि शेणवा या केंद्रांचा समावेश आहे. तसेच ४ उपकेंद्रांनीही राष्ट्रीय स्तरावरील NQAS मानांकन प्राप्त करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यामध्ये बापगाव, खांबला, भिणार आणि काटई या उपकेंद्रांचा समावेश आहे.

याशिवाय जिल्ह्यातील १० उपकेंद्रांनी राज्यस्तरीय NQAS गुणवत्ता मानांकन प्राप्त केले आहे. यामध्ये वडूनवघर, उसगाव, एकलहरे, कान्होर, नडगाव, बिरवाडी, शिरगाव, दापोडे, लाप आणि दोहोळे या उपकेंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमधून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा अधिक प्रभावी, शिस्तबद्ध आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी NQAS अंतर्गत विविध निकषांवर आधारित मूल्यांकन प्रक्रिया राबविण्यात येते. स्वच्छता, रुग्ण सुरक्षा, औषध उपलब्धता, वेळेवर सेवा, प्रशिक्षित मनुष्यबळ, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, नोंद व्यवस्थापन तसेच रुग्ण समाधान यांसारख्या बाबींवर विशेष भर दिला जात आहे.

## "जागर युवा प्रतिष्ठान"च्या उद्घाटनातून सामाजिक सेवेचा नवा दीप प्रज्वलित

### लोणी व्यंकनाथमध्ये वाढदिवस साजरा झाला समाजहिताच्या संकल्पांनी; विविध सामाजिक उपक्रमांनी ग्रामस्थ भारावले

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



आजच्या दिखाऊ आणि खर्चिक वाढदिवसांच्या काळात लोणी व्यंकनाथ येथे एका वाढदिवसाने समाजासमोर वेगळा आदर्श निर्माण केला. जैन महामंडळाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मितेश नाहटा यांच्या वाढदिवसानिमित्त "जागर युवा प्रतिष्ठान" या सामाजिक संघटनेचे उद्घाटन उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडले. हा सोहळा केवळ शुभेच्छांचा न राहता समाजसेवा, गावाविषयीची कृतज्ञता आणि स्वर्गीय अजित पवार यांच्या कार्यस्मृतींना उजाळा देणारा ठरला.

वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक आणि लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गावातील हनुमान मंदिर बांधकामासाठी नाहटा परिवारातर्फे तब्बल ₹२ लाख २१ हजारांची देणगी जाहीर करण्यात आली. तसेच ५००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टँकरचे लोकार्पण करून नागरिकांसाठी मोफत पाणीपुरवठा सुविधा सुरू करण्यात आली.

याशिवाय स्व. खंडू आप्पासाहेब काकडे यांच्या परिवारातील तीन मुलांच्या शिक्षणासाठी ₹७५ हजारांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. कु. वैष्णवी दत्तात्रय गोरखे हिच्या इयत्ता ११ वीपासून पुढील महाविद्यालयीन शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्यात आली. तसेच श्री. मारुती दत्तात्रय लबडे यांच्या शस्त्रक्रियेसाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला.

कार्यक्रमात आयोजित मोफत चष्मा शिबिरालाही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात सुमारे ३०० नागरिकांना उत्तम प्रतीचे चष्मे वाटप करण्यात आले. विविध सामाजिक उपक्रमांमुळे हा वाढदिवस समाजासाठी आधार आणि प्रेरणा देणारा ठरला.

यावेळी बोलताना मितेश नाहटा भावुक झाले. "गावामुळेच आज मी या स्थानापर्यंत पोहोचलो आहे. ग्रामपंचायतीपासून सुरू झालेला माझा प्रवास गावकऱ्यांच्या प्रेम, विश्वास आणि सहकार्यामुळेच शक्य झाला. त्यामुळे गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या सेवेसाठी सदैव कार्यरत राहणार आहे," असे त्यांनी सांगितले.

स्वर्गीय अजित पवार यांनी दिलेली सामाजिक बांधिलकीची शिकवण हीच पुढील वाटचालीची प्रेरणा असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजहिताचे कार्य हेच खरे राजकारण असल्याचा संदेशही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे उद्घाटक टिळक भोस यांनी स्व. अजित पवार आणि नाहटा कुटुंबीयांच्या सामाजिक व राजकीय संबंधांचा उल्लेख करत लोणी व्यंकनाथ गावाच्या विकासातील त्यांच्या योगदानाची आठवण करून दिली. "स्व. अजित पवार आज आपल्या सोबत असते, तर लोणी व्यंकनाथ गाव विकासाच्या नकाशावर आणखी ठळकपणे झळकले असते," असे ते म्हणाले.

राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहटा यांनी वाढदिवस म्हणजे समाजाला काहीतरी देण्याची संधी असल्याचे सांगत समाजहित आणि सेवा हीच आमची खरी भूमिका राहील, असे स्पष्ट केले.

"जागर युवा प्रतिष्ठान"च्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, गरजूंना मदत आणि विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेला हा कार्यक्रम अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणि मनात समाजसेवेची प्रेरणा निर्माण करून गेला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांची पूर्तता : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अहिल्यानगर (स. गांवकरी) : देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले. देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज मुंबईतील प्रभादेवी स्थित रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या सोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार सुनील राणे उपस्थित होते.

## "कुठल्याही लहान मुलाला भावनिक त्रास सहन करावा लागू नये."



पुणे (स. गांवकरी) : झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ह्या मालिकेने आपल्या गहन नाट्यमय घडामोडी, भावनिक वळणे आणि मनाची पकड घेणाऱ्या कथानकासह प्रेक्षकांना आपल्या टीव्ही स्क्रीन्सना खिळवून ठेवले आहे. सध्या या मालिकेत गूढ आणि कौटुंबिक संघर्षासह प्रेक्षकांचे मनोरंजन सुरू असताना माया (सयंतानी घोष) आणि शरद (अजय सिंग चौधरी) यांच्या कथानकाने विशेषकरून प्रेक्षकांच्या मनाला भावनिकरित्या स्पर्श केला आहे. त्यांच्या जटिल गुंतागुंतीच्या नातेसंबंधांमुळे आणि त्यांच्या वेगळे राहण्यामुळे त्यांची मुलगी गुंजन (परी भानुशाली) हिच्यावर त्याचा खोल परिणाम होत आहे. या कथेद्वारे अनेक कुटुंबांना जोडणारी एक नाजूक आणि भावनिक वास्तविकता पुढे येत आहे. या भावनिक प्रसंगातून पालकांमधील गैरसमज आणि वाद मुलांवर शांतपणे कसा परिणाम करतात हे सयंतानी घोष अधोरेखित करत आहे. विशेषतः स्वतःच्या भावना मोकळेपणाने व्यक्त करू न शकणाऱ्या मुलांवर याचा अधिक खोल परिणाम होऊ शकतो याकडे ती लक्ष वेधत आहे. अलीकडील भागांमध्ये दाखवल्याप्रमाणे, माया आणि शरद हे अधिकृतपणे घटस्फोटित नसले तरी वेगळे राहतात आणि त्यांच्या या भावनिक दुराव्याचा त्यांची मुलगी गुंजनवर खोल परिणाम होत आहे. गुंजन ही एक विशेष मुलगी आहे, जिला बोलता आणि ऐकू येत नाही, त्यामुळे तिच्या मनातील भावना व्यक्त करणे तिच्यासाठी आणखी कठीण होते. गुंजनच्या या स्थितीसाठी माया काही प्रमाणात शरदला जबाबदार धरते, त्यामुळे त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला आहे. मायासोबत असताना गुंजनला तिच्या वडिलांची आठवण येते, तर शरदसोबत असताना ती आईच्या मायेची उणीव भासते. गुंजनची एकच इच्छा आहे की तिचे आई-वडील पुन्हा एकत्र येऊन आनंदी कुटुंब बनावेत. पण त्यांच्या वैयक्तिक अडचणी आणि भावनिक संघर्षांमध्ये माया आणि शरद यांच्या हे लक्षात येत नाही की याचा गुंजनच्या मनावर किती खोल परिणाम होत आहे.

## 'वसुधा'ची टीआरपीमध्ये हॅट्रिक; मालिकांचा प्रेक्षकांवर कायम दबदबा




पुणे (स. गांवकरी) : हिंदी मनोरंजन वाहिन्यांच्या स्पर्धेत झी टीव्हीने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले असून 'वसुधा' मालिकेने सलग तिसऱ्या आठवड्यात टीआरपी चार्टमध्ये क्रमांक 1 चे स्थान कायम राखत हॅट्रिक साधली आहे. भावनिक कथानक, कौटुंबिक नात्यांची गुंतागुंत आणि प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या व्यक्तिरेखा यामुळे या मालिकेने देशभरातील प्रेक्षकांची पसंती मिळवली आहे. त्यामुळे 'वसुधा' ही सध्या हिंदी टेलिव्हिजनवरील सर्वाधिक चर्चेत असलेल्या फिक्शन मालिकांपैकी एक ठरली आहे. झी टीव्हीच्या इतर मालिकांनाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेला 1.8 असा प्रभावी टीवीआर मिळाला असून भावनिक आणि कौटुंबिक कथांबद्दल प्रेक्षकांचा वाढता कल पुन्हा अधोरेखित झाला आहे. तसेच 'तुम से तुम तक' या मालिकेनेही 1.6 टीवीआरसह आपली लोकप्रियता टिकवून ठेवली आहे. आर्यवर्धन आणि अनु यांच्या नात्यातील भावनिक चढ-उतार पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असल्याचे चित्र दिसून येत आहे. या तिन्ही मालिकांमुळे झी टीव्हीचे फिक्शन मनोरंजन क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत झाले आहे. 'वसुधा' मालिकेत देवांशची भूमिका साकारणारा अभिनेता अभिषेक शर्मा म्हणाला, "सलग तिसऱ्या आठवड्यात 'वसुधा'ला नंबर 1 स्थान मिळणे आमच्यासाठी खूप मोठा सन्मान आहे. प्रेक्षकांनी दिलेले प्रेम आणि पाठिंबा पाहून संपूर्ण टीम भावूक झाली आहे. प्रत्येक जण मनापासून मेहनत घेत असून प्रेक्षक आमच्या कथेशी इतके जवळून जोडले गेले आहेत, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे." तर 'गंगा माई की बेटियाँ' मालिकेत सिद्धूची भूमिका साकारणारा शिझान खान म्हणाला, "झी टीव्हीच्या मालिकांना प्रेक्षकांकडून मिळणारा प्रतिसाद खूप समाधान देणारा आहे. 'वसुधा' आणि 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकांनी टीआरपीमध्ये दमदार कामगिरी केल्याने संपूर्ण टीमचा उत्साह वाढला आहे. प्रेक्षकांनी आमच्या कथा आणि व्यक्तिरेखांवर दाखवलेला विश्वास आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे."

## भारतातील झपाट्याने वाढणारी 'सायलेंट' आरोग्य समस्या

पुणे (स. गांवकरी) : भारतात बदलती जीवनशैली, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि वाढते मेटाबॉलिक आजार यामुळे हायपरयुरिसेमिया ही समस्या वेगाने वाढत असल्याची चिंता आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यास सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसून येत नाहीत. त्यामुळे ही समस्या अनेकदा दुर्लक्षित राहते. मात्र दीर्घकाळ युरिक ॲसिडचे प्रमाण जास्त राहिल्यास गाऊटचे तीव्र झटके, किडनी स्टोन, मूत्रपिंडाशी संबंधित गुंतागुंत तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा आणि हृदयविकारांसारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. तज्ज्ञांच्या मते, भारतात शहरीकरण, फास्ट फूडचे वाढते सेवन, शारीरिक निष्क्रियता आणि तणावपूर्ण जीवनशैली यामुळे ही समस्या झपाट्याने वाढत आहे. मानवी शरीरात युरिक ॲसिड नैसर्गिकरित्या तयार होते. शरीरातील पेशींमध्ये असलेले पुरिन्स तुटल्यानंतर युरिक ॲसिड निर्माण होते आणि सामान्यतः ते मूत्राद्वारे शरीराबाहेर टाकले जाते.

# युवा नेतृत्व इंजिनियर सुयश लोखंडे

मुळा विभागातील भाजपा युवा मोर्चाचे युवा नेतृत्व इंजिनियर सुयश लोखंडे यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला छोटासा आढावा!

(स. गांवकरी)





अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले इंजिनियर सुयश लोखंडे हे जिद्द, चिकाटी आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रबळ इच्छा यांच्या जोरावर सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत.

"आपण शेतकरी कुटुंबात जन्मलो असलो तरी समाजाचे काहीतरी देणे लागतो," ही भावना मनात ठेवून त्यांनी समाजकारणाची वाट निवडली. त्यांना वडील तथा कोतुळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच संजय लोखंडे तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मार्गदर्शन लाभले असून त्यांनाच ते आपला आदर्श मानतात.

शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अमृतवाहिनी कॉलेजमधून डिप्लोमा शिक्षण पूर्ण केल्यानंतर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून त्यांनी अभियांत्रिकी पदवी संपादन केली. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करत असतानाच त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. सध्या ते पुणे येथील नामांकित "Ecomax" कंपनीमध्ये कार्यरत आहेत.

उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी मोठा युवा मित्रपरिवार निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी पुढे असतात. स्टुडंट असोसिएशनचे अध्यक्ष तसेच भारतीय जनता पार्टी युवा मोर्चामध्ये विविध पदांवर काम करताना त्यांनी युवकांमध्ये आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. युवकांपर्यंत भाजपा पक्षाची विचारधारा पोहोचवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत.

अकोले तालुक्याचे माजी आमदार वैभवभाऊ पिचड तसेच आमदार अक्षयदादा कर्डिले डॉक्टर सुजय दादा विखे पाटील यांचे निकटवर्तीय सहकारी म्हणूनही त्यांची विशेष ओळख आहे. तसेच पुणे येथील नामांकित इन्फोसिस कंपनीचे रिजनल मॅनेजर मंगेश लोखंडे आणि इंजिनियर प्रशांत लोखंडे यांचे ते पुतणे आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त माजी आमदार वैभवभाऊ पिचड, ज्येष्ठ नेते शिवाजीराजे धुमाळ, भाजपा तालुका अध्यक्ष सिताराम भांगरे, युवा मोर्चा अध्यक्ष राहुल देशमुख, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर प्रमोद धुमाळ, अनिरुद्ध डोंगरे, शासकीय स्वीय सहाय्यक अनिकेत थोरात, भाजपाचे नेते गणेश पोखरकर, पत्रकार अशोक शेळके, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी सुरेश गोंडके, प्रतीक वाकचौरे, युवा मोर्चा अध्यक्ष ऋषिकेश साबळे विखे पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष विकास वाकचौरे आदी मान्यवरांनी शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

इंजिनियर सुयश लोखंडे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

# फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्रांची संख्या ३४५ वर

पुणे : (स. गांवकरी)

जागतिक प्रकाशयोजना क्षेत्रातील आघाडीची कंपनी सिग्निफायने भारतभर आपल्या फिलिप्स स्मार्ट प्रकाश केंद्र जाळ्याचा विस्तार करत देशातील उपस्थिती ३४५ दुकानांपर्यंत वाढवली आहे. स्मार्ट आणि जोडलेल्या घरगुती सुविधांकडे ग्राहकांचा वाढता कल लक्षात घेऊन कंपनीने हा विस्तार हाती घेतला आहे. मे महिन्यात कंपनीकडून तब्बल १५ नवीन स्मार्ट प्रकाश केंद्रे सुरू करण्यात येत असून, त्यामध्ये नोएडा, दिल्ली, सोनीपत, बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, रायपूर, बरेली, सोलन, विजयवाडा आणि मध्यमग्रामसह विविध शहरांचा समावेश आहे. या माध्यमातून सिग्निफायने अनुभवाधारित आणि आकर्षक रचनांवर आधारित प्रकाशयोजना विक्रीला अधिक चालना दिली आहे. कंपनीच्या मते, नवीन स्मार्ट प्रकाश केंद्रांमध्ये ग्राहकांना सजावटी, उपयुक्त आणि स्मार्ट प्रकाशयोजना उपायांचा विस्तृत अनुभव घेता येणार आहे. आधुनिक गृहसजावट, वैयक्तिक पसंती आणि ऊर्जा बचतीवर भर देणाऱ्या ग्राहकांसाठी ही केंद्रे विकसित करण्यात आली आहेत. या विस्ताराबाबत प्रतिक्रिया देताना सिग्निफाय ग्रेटर इंडियाचे ग्राहक व्यवसाय प्रमुख सी. अरुण कुमार म्हणाले, "भारतीय ग्राहक आता प्रकाशयोजनेकडे केवळ गरज म्हणून नव्हे, तर जीवनशैली आणि घराच्या सजावटीचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहत आहेत. आकर्षक, आधुनिक आणि अनुभव समृद्ध करणाऱ्या प्रकाशयोजना उपायांची मागणी झपाट्याने वाढत आहे. जवळपास दर दोन दिवसांनी नवीन स्मार्ट प्रकाश केंद्र सुरू होत असल्यामुळे भारतातील आधुनिक घरगुती अनुभवांची वाढती मागणी स्पष्ट होत आहे."

# नारायण चौधरी यांच्या हस्ते डॉ. किशोर पाटील यांचा गौरव!

भिवंडी : (स. गांवकरी)



मिडिया हब पत्रकार परिषद, भिवंडी यांच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्ताने दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक तथा भिवंडीतील वरिष्ठ पत्रकार डॉ. किशोर बळीराम पाटील यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल भिवंडी महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर श्री.नारायण चौधरी यांच्या शुभहस्ते शाल,सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. पत्रकारितेतील निष्ठा, सामाजिक बांधिलकी, जनसेवेची भावना तसेच पत्रकार परिषदेस दिलेले सहकार्य आणि योगदान याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ.किशोर बळीराम पाटील यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पत्रकारिता हीच जनसेवा असून समाजहितासाठी कार्यरत राहा, कारण पत्रकार हा देशाचा चौथा स्तंभ आहे. तुमच्या मुळेच आम्हा सर्वांना अनेक गोष्टींची माहिती होते. तसेच आज मला या ठिकाणी बोलावून माझा सन्मान केला व पत्रकारांचा सन्मान करण्याचा भाग्य मला मिळाला.या पत्रकारिता सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व पत्रकारांना निश्चितच प्रेरणा मिळणार असल्याची भावना यावेळी मार्गदर्शन करताना महापौर नारायण चौधरी यांनी व्यक्त केली. पत्रकारांनी आयोजित केलेला कोणताही कार्यक्रम असो त्या ठिकाणी पत्रकारांना पुढे जाण्याचं व्यासपीठ मिळतं, भिवंडीतील सर्व पत्रकार पत्रकारांची एक वज्रमुठ तयार झाली तर कोणीही पत्रकारांना दबाव आणू शकत नाही. जर पत्रकारांनीच पत्रकारांचे पाय ओढण्याचा प्रयत्न केला तर कोणताही पत्रकार पुढे जाऊ शकत नाही म्हणून आपण सर्व एक झालो पाहिजे असे आवाहन भिवंडीतील ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री किशोर बळीराम पाटील यांनी मार्गदर्शन करताना केले. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार आचार्य सुरज पाल यादव, युवा अध्यक्ष तेजस मनोज काटेकर, अमर,राष्ट्रीय अध्यक्ष इरशार खान, राष्ट्रीय महासचिव युसुफ मन्सुरी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष संदीप गुप्ता तसेच राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज मेमन ॲड. चांदणी मुजावर, छोटी निलम, आदी मान्यवर व मोठ्या संख्येने पत्रकार वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय अध्यक्ष इरशार खान यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय कार्याध्यक्ष संदीप गुप्ता यांनी केले.हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिडिया हब पत्रकार परिषदेच्या सर्व सभासदांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# पारनेर-जामगाव रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी

## राहुलनगर परिसरातील नागरिकांचा जीव टांगणीला

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर ते जामगाव या प्रमुख जोड रस्त्यावर वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली असून, वाढत्या वेगामुळे हा रस्ता आता अपघाताचा 'ब्लॅक स्पॉट' बनू लागला आहे. या रस्त्यालगत असलेल्या राहुलनगर वस्ती परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला असून, या ठिकाणी तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसवावेत, अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून जोर धरत आहे. पारनेर-जामगाव रस्ता हा परिसरातील प्रमुख गावांना जोडणारा मुख्य मार्ग आहे. या रस्त्यावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी गाड्यांसह मोठ्या प्रमाणावर अवजड वाहतूक चालते. महामार्गासारखी स्थिती झालेल्या या रस्त्यावर वाहनचालक कमालीच्या वेगाने वाहने चालवतात. रात्रीच्या वेळी तर हा वेग अधिकच जीवघेणा ठरतो. या रस्त्याला लागूनच 'राहुलनगर' ही मोठी निवासी वस्ती आहे. वस्तीमधील लहान मुले, शाळा-कॉलेजला जाणाऱ्या मुले,मुली आणि वृद्ध नागरिक यांना रोजच्या कामासाठी, शाळेत जाण्यासाठी किंवा बस पकडण्यासाठी हा रस्ता ओलांडावा लागतो. मात्र, समोरून येणाऱ्या वाहनांचा वेग इतका प्रचंड असतो की, रस्ता ओलांडणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे. अनेकदा वाहनचालक वस्तीचा परिसर असूनही वाहनांचा वेग कमी करत नाहीत. यामुळे येथे किरकोळ अपघात रोजचेच झाले असून, एखादा मोठा भीषण अपघात घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

"आमची लहान मुले खेळताना किंवा शाळेत जाताना रस्त्यावर आली की आमचा जीव वर-खाली होतो. वृद्ध माणसांना तर रस्ता ओलांडणे अशक्य झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या संवेदनशील भागात त्वरित पांढरे पट्टे मारून दर्जेदार गतिरोधक बसवावेत, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल," अशी संतप्त प्रतिक्रिया राहुलनगरमधील स्थानिक नागरिकांनी दिली आहे.




# एमआयटी डब्ल्यूपीयूचा अद्वितीय उपक्रम

पुणे : (स. गांवकरी)

- स्टार्टअपसाठी ई-मोबिलिटी सेंटर ऑफ एक्सलन्स सेंटर माइलस्टोन
- इलेक्ट्रिक वाहन उद्योग, प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी यशस्वी उपक्रम

इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमध्ये स्थापन केलेल्या सेंटर फॉर एक्सलेन्स इलेक्ट्रिक व्हेकल्सचे माध्यमातून इलेक्ट्रिक वाहने आणि संबंधीत तंत्रज्ञानाच्या क्षेत्राला परिपूर्ण करण्यासाठी संशोधन, विकास, कौशल्य विकास यावर अधिक भर दिला जात आहे. तसेच टीबीआय सेंटर मध्ये३ यशस्वी स्टार्टअप, ४५ वेगवेगळ्या स्टार्टअप वर कार्य सुरू आहे. ज्यांना यशस्वीरित्या स्वतःचे स्टार्टअप सुरू करावयाचे आहे, त्यांच्यासाठी हे सेंटर सर्वतोपरी मदत करेल. अशी माहिती माईर्स एमआयटीचे संस्थापक व सेंटर फॉर एक्सलेन्स इलेक्ट्रीक व्हेइकल्सचे संचालक प्रा. प्रकाश जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी एमआयटी टीबीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद गोरे, ईॲण्डटीसीच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ. पारुल जाधव व सहयोगी प्राध्यापक डॉ. साकेत येवलेकर उपस्थित होते.

# मुळा नदीवरील पुलावरून प्रवास ठरतोय जीवघेणा!

## टेकडवाडी परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांचा प्रवास धोक्यात; अपघात घडण्यापूर्वी शासनाने जागृत व्हावे



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील देसवडे येथील टेकडवाडी व जांबुत-साकुर रस्त्यावरील मुळा नदीवर असलेला पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. या पुलाला दोन्ही बाजूंनी सुरक्षा कठडे (रेलिंग) नसल्यामुळे येथून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे. यामुळे स्थानिक ग्रामस्थ आणि शाळकरी विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला असून, प्रशासनाच्या उदासीनतेबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे.

टेकडवाडी परिसरात जवळपास ७०० ते ८०० लोकसंख्या आहे. देसवडे येथील टेकडवाडी, जावळदरा, पोखरी, जांबुत बुद्रुक, ठाकरवाडी आणि भिल्ल वस्ती या भागातील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी साकुरसारख्या मोठ्या बाजारपेठेच्या गावी जातात. या सर्वांना दररोज याच पुलावरून ये-जा करावी लागते. पुलाला कठडेच नसल्याने सायकल किंवा दुचाकीवरून जाताना लहानसा थरकापही मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकतो.

> अनेक दिवसांपासून आम्ही प्रशासनाकडे पुलाला कठडे बसवण्याची मागणी करत आहोत, पण अधिकारी ढिम्म आहेत. पावसाळ्यात मुळा नदीला पूर आल्यावर मुलांचा जीव मुठीत धरून वाट पाहावी लागते. शाळकरी मुले आणि ग्रामस्थांचा जीव धोक्यात आहे. प्रशासनाने तात्काळ काम सुरू न केल्यास आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल.
>
> — दत्ता टेकुडे (स्थानिक ग्रामस्थ)

मुळा नदी ही पावसाळ्यात नेहमीच दुधडी भरून वाहते. अनेकदा पूर आल्यावर पाण्याचा प्रवाह पुलाच्या अगदी जवळून किंवा पुलावरून जातो. अशा वेळी पाण्याचा अंदाज न आल्याने आणि बाजूला कोणतेही संरक्षक कठडे नसल्याने एखादे वाहन किंवा पादचारी थेट नदी पात्रात वाहून जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. येथे मोठा अपघात घडण्याची प्रशासन वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

प्रशासनाने या समस्येची गंभीर दखल घेऊन पावसाळा सुरू होण्यापूर्वी या पुलाला चांगल्या दर्जाचे संरक्षक कठडे बसवावेत, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे. अन्यथा, आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.